प्रकाशनयोग्य

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात

दिवाणी मूळ/अपिलीय अधिकारिता

वर्ग केलेली केस (दिवाणी) क्र........./२०२०

---

(वर्ग केलेल्या याचिका (दिवाणी) क्र. ८७ – १०१/२०१४)

फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया............... विनंती अर्जदार

विरुध्द

डॉ. एस. के. तोशनीवाल एज्युकेशनल ट्रस्टची

विदर्भ इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी आणि इतर............ उत्तरवादी

सह

दि.अ.क्र.२०२४–२७/२०२० [एसएलपी (वि.अ.या) (दि) क्र.४१२४–४१२७/२०१६]

दि.अ.क्र. २०२८ – ३१/२०२० [ वि.अ.या (दि) क्र. २६४८०–२६४८३/२०१७]

दि.अ.क्र. २०३२/२०२० [वि.अ.या (दि) क्र. २५१६०/२०१७]

दि.अ.क्र. २०३५/२०२० [ वि.अ.या (दि) क्र. ६०८/२०१८]

दि.अ.क्र. २०३५/२०२० [ वि.अ.या (दि) क्र. ६०६/२०१८]

दि.अ.क्र. २०३३/२०२० [वि.अ.या (दि) क्र. ९५४७/२०१८]

दि.अ.क्र. २०३४/ २०२० [ वि.अ.या (दि) क्र. ९५४६/ २०१८]

दि.अ.क्र. २०३७/२०२० [ वि.अ.या (दि) क्र. ९५७२/ २०१८]

दि.अ.क्र. २०३९/ २०२० [ वि.अ.या (दि) क्र. ११७१/ २०१८]

दि.अ.क्र. २०३८/ २०२० [ वि.अ.या (दि) क्र. ११५१/ २०१८]

दि.अ.क्र. २०४०/ २०२० [वि.अ.या (दि) क्र. ३६४३४/२०१७]

दि.अ.क्र. २०४१/ २०२० [ वि.अ.या (दि) क्र. २६३९१/ २०१८]

रिट याचिका (दि.) क्र. ९२६/ २०१८

दि.अ.क्र २०४२/ २०२० [ वि.अ.या (दि) क्र. २६३७३/ २०१८]

दि.अ.क्र. २०४३/ २०२० [ वि.अ.या (दि) क्र. १५३२८/२०१९]

आणि

रिट याचिका (दि.) क्र. १५०१/२०१९

न्यायनिर्णय

न्या.एम.आर. शहा

वर्ग केलेल्या (दिवाणी) याचिका क्र.८७ –१०१/२०१४ या दाखल करुन घेण्यात आल्या आहेत आणि रिट याचिका क्र.३७८३/२०१३– डॉ. एस. के. तोशनीवाल एज्युकेशनल ट्रस्टची विदर्भ इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी विरुध्द महाराष्ट्र राज्य आणि इतर, रि. या. क्र. ३९४५/२०१३ – यंग इंजिनिअर्स इज्युकेशन सोसायटी वि. महाराष्ट्र राज्य आणि इतर ज्या मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडे प्रलंबीत आहेत, रि. या. क्र. ४४९२ / २०१३ – दि. शिरपूर एज्युकेशन सोसायटी आणि इतर वि. महाराष्ट्र राज्य आणि इतर, रि. या. क्र. ५१०४ / २०१३ – श्री. भगवान कॉलेज ऑफ फार्मसी वि. महाराष्ट्र राज्य आणि इतर, रि. या. क्र. ५१५० / २०१३ – किरण आणि इतर वि. महाराष्ट्र राज्य आणि इतर, रि. या. क्र. ५६८१ / २०१३ – यशोदाबाई दगडु सराफ चॅरिटेबल ट्रस्ट आणि अन्य वि. महाराष्ट्र राज्य आणि इतर, रि. या. क्र. ५९१४/ २०१३ – नांगाव एज्युकेशन सोसायटी ची इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, नांगाव वि. महाराष्ट्र राज्य आणि इतर या याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे प्रलंबित आहेत, रि. या. क्र. १९२५३ / २०१३ – आल्डेल एज्युकेशन ट्रस्ट वि. ऑल इंडीया कॉन्सिल फॉर टेक्नीकल एज्युकेशन रि. या. क्र. १९२५४ / २०१३ – शिक्षण आणि कृषी विकास प्रतिष्ठान, मेडशिंगी वि. ऑल इंडिया कॉन्सिल फॉर टेक्नीकल एज्युकेशन आणि इतर, रि. या. क्र. १९२५५ / २०१३ – के. बि. एच. ट्रस्ट वि. ऑल इंडिया कॉन्सिल फॉर टेक्नीकल एज्युकेशन आणि इतर, या याचिका मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत, रि. या. क्र. १९८८७

/ २०१३ दि. शिरपूर एज्युकेशन सोसायटी  आणि अन्य वि. महाराष्ट्र राज्य हि याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या  औरंगाबाद खंडपीठाकडे प्रलंबित आहे, रि. या. क्र. २५८५७ / २०१३ – सेंट मेरीज ग्रुप ऑफ इन्स्टिटयुशन्स, हैद्राबाद वि. दि फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया आणि इतर, रि. या. क्र. २६०७७ / २०१३ – वि. श्रीधर आणि इतर वि. दि फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया आणि इतर, रि. या. क्र. २६२८६ / २०१३ – सेंट मेरीज ग्रुप ऑफ इन्स्टिटयुशन्स गुंटूर वि. दि फार्मसी  कॉन्सिल ऑफ इंडिया आणि इतर या याचीका हैद्राबाद येथील आंध्रप्रदेश उच्च न्यायालयात प्रलंबीत आहेत आणि रि. या. क्र. १३८८ / २०१३ – काशी इन्स्टिटयुट  ऑफ फार्मसी वि. भारत सरकार आणि इतर हि याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाकडे प्रलंबित आहे, या सर्व याचिका या न्यालयाकडे वर्ग करण्यात आल्या आहेत.

२. विशेष अनुमती याचिकांना परवानगी देण्यात आली आहे.

३. या गटातील खटल्यांमध्ये कायदा आणि वस्तुस्थितीचा सामाईक प्रश्न उपस्थित होत असल्यामुळे हया सामाईक न्यायनिर्णय आणि आदेशाद्वारे या सर्व खटल्यांमध्ये निकाल देण्यात येत आहे.

४. या सर्व याचिकांमधील संबंधीत उत्तरवादी महाविदयालयांनी, फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया ( यापुढे याचा उल्लेख पी. सी. आय. असा केला आहे.) यांच्या दुसऱ्या पाळीसाठी मान्यता देणे आणि विविध फार्मसी अभ्यासक्रमासाठी विदयार्थ्यांची प्रवेश संख्या  वाढविण्यावर निर्बंध घालणे या कारवाई संबंधाने, आपापल्या संबंधीत उच्च न्यायालयांकडे गाऱ्हाणे मांडले होते आणि संबंधीत महाविदयालयांनी, ऑल इंडिया कॉन्सिल ऑफ  टेक्नीकल एज्युकेशन ( यापुढे याचा उल्लेख ए.आय. सी. टी. इ. असा केला आहे.) कडून प्राप्त केलेल्या आवश्यक परवानगी / मान्यतेनुसार विदयार्थ्यांची प्रवेशसंख्या वाढविलेली असल्या कारणाने, संबंधीत उच्च न्यायालयांनी सदर महाविदयालयांना प्रवेशसंख्या वाढविण्यास / वाढविलेली प्रवेशसंख्या कायम ठेवण्यास परवानगी दिली आहे. सदर संबंधीत उच्च न्यायालयांनी असा निष्कर्श काढला आहे कि ए. आय.सी.टी.इ.

आणि पी. सी. आय. या दोन संस्थांमध्ये ए.आय. सी. टी. इ. हि सर्वोच्च संस्था आहे आणि ए.आय. सी. टी. इ. चे निर्णय पी.सी.आय. च्या निर्णयांपेक्षा वरचढ असतील आणि असे कि, उच्च न्यायालयांनी अंतरिम आदेषाद्वारे सदर संस्थांना, ए.आय. सी. टी. इ. ने दिलेल्या मान्यते / परवानगी नुसार वाढविलेली प्रवेशसंख्या कायम ठेवण्यास परवानगी दिली आहे आणि काही प्रकरणी असे अंतरीम आदेश कायम करण्यात आले आहेत. त्यामुळे, प्रस्तुतच्या खटल्यांमध्ये, अभ्यासक्रमांना मान्याता, फार्मासिस्ट (औषधनिर्माता) म्हणून आवश्यक असलेली किमान शैक्षणिक अर्हता, फार्मासिस्ट म्हणून नोंदणी भविष्यातील व्यावसायीक वर्तणूकीचे नियमन यांसह फार्मसी विषयाच्या संबंधाने, फार्मसी ॲक्ट , १९४८ (यापुढे याचा उल्लेख दि फार्मसी अॅक्ट असा केला आहे.) किंवा ऑल इंडिया कॉन्सिल ऑफ टेक्नीकल एज्युकेशन ॲक्ट, १९८७ ( यापुढे याचा उल्लेख दि ए.आय. सी. टी. इ. अॅक्ट असा केला आहे ) या पैकी कोणता कायदा लागू करतो असा मुद्या अंतर्भूत आहे.

**<u>पी. सी. आय. चे निवेदन:</u>**

५. पी. सी. आय. तर्फे उपस्थित विद्वान वरिष्ठ वकिल श्री. मनिंदर सिंग यांनी पुढीलप्रमाणे जोरदार युक्तीवाद सादर केला.

५.१ दि फार्मसी अॅक्ट मध्ये अंतर्भूत असलेल्या वैधानिक योजनेच्या संबंधाने, जी फार्मसी विषयाशी संबंधीत एक परिपूर्ण अशी संहिता आहे, त्याप्रमाणे फार्मसी विषयाशी निगडीत शैक्षणिक दर्जाचे नियमन करण्याविषयीची अधिकारिता आणि परिणामी फार्मासिस्टच्या व्यावसायीक वर्तणूकि विषयीची अधिकारीता पूर्णपणे केवळ पीसीआय कडे निहीत आहे आणि ए.आय.सी.टी.इ. कडे या विषयीची अधिकारीता ही नाही व तशी शक्तिही नाही.

५.२ तसेही, प्रस्तुतच्या खटल्यांमध्ये अंतर्भूत असलेला मुद्दा हा आता पूर्णपणे नविन नसून, हया

न्यायालयाच्या – एआयसीटीई वि. श्री. प्रिंस शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे आर्किटेक्चर महाविदयालय (२०१९), ए.आय.सी.टी.इ. ऑनलाईन एस. सी. १४४५ (२०१९) १६ स्केल ४२१ या खटल्यातील निकालामध्ये तो स्पष्टपणे समाविष्ट होत आहे. सबब असे सादर करण्यात येते कि सदर खटल्यामध्ये, दि आर्किटेक्टस ॲक्ट १९७२ अन्वये गठीत केलेल्या कॉन्सिल ऑफ आर्किटेक्चर च्या बाबतीतील तशाच एका वैधानिक योजनेच्या परामर्श घेता, या न्यायालयाने असा निर्णय दिला आहे कि, जरी ए.आय.सी.टी.इ. ॲक्ट च्या कलम २ (ग) मध्ये "तांत्रीक शिक्षणा" च्या व्याख्येमध्ये "आर्किटेक्चर" हा शब्द वापरला असला तरी जेव्हा ए.आय.सी.टी.ई. आपला नियामक आराखडा आयात करते अशा परिस्थितीत सदर शब्द "तांत्रिक शिक्षणा " च्या व्याख्येतून वगळयात यावा व तो तेथे गैरलागू समजण्यात यावा. पुढे असे सादर करण्यात येते कि, अशा परिस्थितीत असा निकाल देण्यात आला कि, जोवर आर्किटेक्चर च्या पदवी आणि पदविकांच्या मान्यतेचा प्रश्न आहे तोवर आर्किटेक्चर ॲक्ट १९७२ लागू राहिल आणि आर्किटेक्चर विषयातील पदवी आणि पदविकासंदर्भात ए.आय.सी.टी.इ. ला कोणतीही नियामक उपाय योजना लादण्याचा अधिकार असणार नाही. यासदंर्भात सदर निर्णयातील परिच्छेद क्र. ६७ ते ७० वर जास्त भरवसा ठेवण्यात आला.

तसेच सदर निर्णयामध्ये या न्यायालयाने, आर्किटक्टस ॲक्ट १९७२ मधील तंतोतंत समान असलेली वैधानिक योजना विचारात घेतली असल्यामुळे दि फार्मसी ॲक्ट चा अन्वयार्थ लावण्यासाठी लावण्यासाठी देखील ती प्रत्यक्ष लागू करता येईल. पुढे असे सादर करण्यात आले की, फार्मसी च्या बाबतीत देखील ए.आय.सी.टी.ई. ची भूमिका हि निव्वळ "तांत्रिक शिक्षण" या संज्ञेच्या, ए.आय.सी.टी.ई. ॲक्ट च्या कलम २ (ग) मधील व्याख्येतील "फार्मसी" या शब्दाच्या वापरावर आधारीत आहे. पुढे असे सादर करण्यात आले कि, वरील निर्णयामध्ये या न्यालयाने घालून दिलेल्या कायदयाच्या संदर्भात त्याचप्रमाणे दि फार्मसी ॲक्ट मधील वैधानिक योजनेच्या संदर्भात, ए.आय.सी.टी.इ. ॲक्ट मधील कलम २ (ग) मधील "तांत्रिक शिक्षणा" च्या

व्याख्येतून "फार्मसी" हा शब्द वगळला जाण्यास पात्र आहे आणि फार्मसी क्षेत्रातील किमान शैक्षणिक मानके विहीत करण्यासाठी करण्यात आलेल्या नियामक उपाययोजना च्या संदर्भात तो गैरलागू असल्याचा निर्णय देण्यास पात्र आहे.

५.३ याशिवाय, दि फार्मसी ॲक्ट मधील वैधानिक योजनेच्या बाबतीत, जी एक परिपूर्ण संहिता आहे आणि फार्मसी विषयाच्या बाबतीत एक विशेष कायदा आहे, पीसीआय ला केवळ फार्मसी व्यवसायाचेच नव्हे तर अशा शैक्षणिक संस्थांचे देखील नियमन करण्याचे अधिकार प्रदान केलेले आहेत, जेथुन लोकं फार्मासिस्ट हि पदवी प्राप्त करतात आणि या बाबतीत ए.आय.सी.टी.इ. ला कोणतीही अधिकारिता नाही.

५.४ फार्मसी हा व्यवसाय औषधी द्रव्य तयार करण्याचा, टिकवण्याचा, मिश्रण करण्याचा आणि औषधे तयार करुन देण्याचा आहे. पुढे असे सादर करण्यात आले कि दि फार्मसी ॲक्ट अन्वये पीसीआय या संस्थेचे गठन करण्यात आहे, जीला भारतातील फार्मसी शिक्षणाचे व व्यवसायाचे नियमन करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहे. पुढे असे सदर करण्यात आले कि, पीसीआय ला, भारतामध्ये एखादया व्यक्तिला फार्मासिस्ट म्हणून व्यवसाय करण्याकरीता आवश्यक असलेली अर्हता ठरविणे आणि ती अंमलात आणणे यासह तस अभ्यासक्रम आणि सदर अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणाऱ्या संस्था, ज्यामुळे एखादयाला फार्मासिस्ट चा व्यवसाय करणे शक्य होईल, यांना मान्यता देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत, पीसीआय तर्फे विद्वान वकिल यांनी फार्मसी ॲक्ट ची उद्दिष्टे व कारणे यांचा आधार घेत असे जोरदार कथन केले कि पीसीआय ने फार्मासिस्ट साठीची किमान शैक्षणिक मानके विहित करणे व अभ्यासक्रमांना मान्याता देणे अपेक्षित आहे.

५.५ फार्मसी हे अनेक शैक्षणिक क्षेत्रा / विषयांपैकी असे एक क्षेत्र आहे जेथे सदर विषयातील शिक्षण देण्याकरीता विधीमंडळाची स्थापना केली गेली आहे आणि त्या क्षेत्रातील अग्रगण्य व्यावसायीकांचा समावेश

असलेल्या स्वायत्त सांविधानीक संस्थेने त्यासाठीची किमान मानके विहित करावयाची असतात. पुढे असे सादर करण्यात आले कि हि संस्था केवळ सदर शैक्षणिक क्षेत्रातील / विषयातील विविध अभ्यासक्रमातील शैक्षणिक मानकेच विहित करते असे नव्हे तर विदयार्थी आणि शिक्षकांसाठी पात्रतेच्या अटी, अभ्यासक्रमाचा तपशील परिक्षांच्या मूल्यमापनाचा दर्जा इ. गोष्टी देखील ठरविते. पुढे असे सादर करण्यात आले कि हि संस्था पडताळणी आणि तपासणीबाबत घालून दिलेल्या प्रमाणपध्दतीच्या आधारावर, महाविदयालये / शैक्षणिक संस्थांमधील विषयांच्या अभ्याक्रमांना देखील मान्यता देते. पुढे असे सादर करण्यात आले कि सदर कायदा हा सदर शैक्षणिक क्षेत्र व्यावसायीकांची नोंदणी तसेच नोंदणीकृत व्यावसायीक म्हणून त्यांची त्यानंतरची वर्तणूक याचा देखील परामर्श घेते.

५.६ त्याचप्रमाणे ज्या स्वायत्त सांविधानीक प्राधिकरणाला, एखादया विशिष्ठ शैक्षणिक क्षेत्रातील व्यावसायीकांच्या वर्तणुकीवर देखरेख आणि नियंत्रण ठेवणे कायदयाने बंधनकारक केले आहे त्या प्राधिकरणाला शैक्षणिक दर्जा, अभ्याक्रम / संस्थांची मान्यता, परिक्षेच्या दर्जाचे मूल्यमापन आणि त्यानंतर त्यांच्या नोंदणीसाठी मान्यता देणे इ. बाबी ठरविण्याची देखील मुभा देणे अत्यंत महत्वाचे आणि / किंवा आवश्यक आहे.

५.७ कायदयाने फक्त एकाच स्वायत्त सांविधानिक प्राधिकरणाला हि सर्व एकात्मिक कार्ये करण्यासाठी स्पष्टपणे दृष्टीसमोर ठेवले आहे आणि त्यामुळे या क्षेत्रात अगोदरच एक प्राधिकरण कार्यरत असताना दुसरे स्वायत्त प्राधिकरण हि अधिकारिता ग्रहण करण्याचा / बळकावण्याचा प्रयत्न करुन त्यायोगे तापदायक व्यावहारीक अडचणी, संघर्ष आणि विसंगती निर्माण करीत आहे ज्यामुळे विशेष कायदयाद्वारे साध्य करावयाचे उद्दिष्ट निष्फळ ठरत आहे हे मानणे अशक्य आहे.

५.८ फार्मसी हा विषय विशिष्ठ आहे, सर्वसामान्य नव्हे पुढे असे सादर करण्यात आले कि संसदेने याचा परिपूर्ण परामर्श फार्मसी ॲक्ट च्या माध्यमातून घेतलेला आहे. ज्या अन्वये सर्व बाबी जसे कि अभ्याक्रमाची

मान्यता, अभ्यासक्रमाचा तपशील ठरविणे, विदयार्थी तसेच शिक्षकांसाठी पात्रतेच्या अटी ठरविणे, परिक्षांच्या दर्जाचे मूल्यमापन करणे, नोंदणी मंजूर करणे, वाईट वर्तणुकीबाबत कारवाई करणे इ. चा पूर्ण समावेश होतो. पुढे असे सादर करण्यात आले कि, हि सर्व सांविधीक उद्यिष्टे, फार्मसी ॲक्ट आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेले वैधानिक नियम आणि विनियम याद्वारे साध्य होत आहेत.

५.९ फार्मसी अ्ॅक्ट च्या कलम १० अन्वये पीसीआय ला, फार्मासिस्ट म्हणून अर्हता धारण करण्यासाठी आवश्यक असलेली किमान शैक्षणिक पात्रता विहित करणारे शैक्षणिक नियम तयार करण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. पुढे असे सादर करण्यात आले कि,, कलम १० (२ नुसार) असे शैक्षणिक नियम, खालील बाबी विहित करु शकतात.....

(अे) अभ्यासाचे स्वरुप व कालावधी आणि परिक्षेला प्रवेश मिळवण्याआधी घ्यावयाचे व्यावहारीक प्रशिक्षण

(बी) मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांना पुरविण्यात येणारी साधनसामग्री आणि सोयी सुविधा

(सी) परिक्षेचे विषय आणि त्यात प्राप्त करावयाचा दर्जा

(डी) परिक्षेसाठी प्रवेशच्या इतर अटी

५.१० दि फार्मसी ॲक्ट च्या कलम १२ अंतर्गत, अभ्यासक्रमासाठी आणि परीक्षांसाठी मान्यता देणाऱ्या अधिकारांचा समावेश आहे. पुढे असे सादर केले आहे कि, सदर तरतुदी अन्वये राज्यातील कोणतेही प्राधिकरण,ज्याला फॉर्मसी विषयाचे अभ्यासक्रम चालविण्याची शक्ती प्रधान करण्यात आली आहे ते, शैक्षणिक विनियमानुसार अभ्याक्रमाला मान्याता मिळावी म्हणुन केंद्रिय परिषदेकडे (सेंट्रल कॉन्सिल) अर्ज करु शकते. त्याचप्रमाणे, पुढे असे सादर करण्यात आले कि जे प्राधिकरण राज्यात फार्मसी विषयाच्या परिक्षेचे आयोजन करते ते पीसीआय कडे अशा परिक्षेच्या मान्यतेसाठी अर्ज करु शकते. पुढे असे सादर करण्यात आले कि ज्या

विदयार्थ्याने असा मान्ययताप्राप्त अभ्यासक्रम पूर्ण केला असेल / त्यात उत्तीर्ण झाला तो, इतर आवश्यक त्या बाबी पूर्ण करण्याच्या अधीन राहून, फार्मासिस्ट म्हणून नोंदणीकृत होऊ शकतो. त्यामुळे, फार्मसी विषयातील कोणताही अभ्यासक्रम सुरु करावयाचा असल्यास, फार्मसी अ ॅक्ट अन्वये, पीसीआय ची मान्यता असणे अनिवार्य आहे आणि त्याशिवाय कोणत्याही विदयार्थ्याला अशा अभ्यासक्रमातील पदवी किंवा पदविका प्रदान करता येणार नाही, ज्याद्वारे त्याला देशामध्ये फार्मसी व्यवसाय करण्यासाठी फार्मासिस्ट म्हणून नोंदणी करण्याचा अधिकार प्राप्त होतो. फार्मसी ॲक्टच्या कलम १२ (१) अन्वये पी. सी. आय. ला, अशा संस्थेला मान्यता देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत जी फार्मासिस्ट करिता अभ्यासक्रमाचे आयोजन करते. कलम १२ प्रमाणे केंद्रिय परिषदेकडे अशी मान्यता मागणारा अर्ज करावा लागतो, जी परिषद तीला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, जसे कि, सदरचा अभ्यासक्रम हा कलम १० नुसार, ज्यामध्ये अभिप्रेत असलेल्या शैक्षणिक विनियमांशी अनुरुप आहे का, सदरचा अभ्यासक्रम हा फार्मासिस्ट च्या परिक्षेसाठी प्रवेश घेण्याकरिता मान्यताप्राप्त असल्याचे जाहिर करेल.

५.१०.१ सदर विहित केलेल्या अटींची पूर्तता न केल्यास अशा 'परिक्षेला' प्रदान केलेली मान्यता काढून घेण्याचे अधिकार देखील कलम १३ अन्वये केंद्रिय परिषदेस प्रदान केले आहेत.

५.१०.२ कलम १६ अन्वये कार्यकारी समितीला, कोणत्याही संस्थेची, जी संस्था मान्यताप्राप्त अभ्यासक्रम उपलब्ध करुन देते किंवा अशा संस्था ज्यांनी अभ्यासक्रम किंवा परिक्षेला मान्यता मिळावी म्हणून अर्ज केलेले आहेत, अशा संस्थेची / संस्थांची तपासणी करण्यासाठी निरिक्षक नेमण्याचे अधिकार प्रदान केले आहेत.

५.१०.३ कलम २९ हे फार्मासिस्ट ची नोंदवही तयार करणे आणि सुस्थितीत ठेवणे यासंबंधी नोंदवहीमध्ये अतिरिक्त अर्हतेची नोंद करण्याची तरतूद आहे. कलम ३६ अन्वये

कोणत्याही व्यक्तिस नोंदवही मधून कायमस्वरुपी किंवा तात्पुरत्या कालावधीसाठी काढून टाकण्याची तरतूद आहे. त्यामुळे, हे स्पष्ट होते कि पी. सी. आय. केवळ त्यांच्या तरतुदींचेच नियमन करीत नाही तर असे अभ्यासक्रम आणि परिक्षा, ज्यायोगे कलम ३२ (२) अन्वये फार्मासिस्ट म्हणून नोंदणीकृत होण्यासाठी उचीत अर्हता मिळते, यांना मान्यता प्रदान करुन सदर व्यवसायातील प्रवेशाचे नियमन करण्यात एक महत्वाची भुमिका देखील बजावते. पुढे असे सादर करण्यात आले कि दि फार्मसी ॲक्ट नुसार जोपर्यंत एखादी व्यक्ती नोंदणीकृत फार्मासिस्ट होत नाही तोर्यंत त्याला किंवा तिला दि फार्मसी ॲक्ट च्या कलम ४२ अन्वये फार्मसीचा व्यवसाय करता येत नाही आणि कलम ४२ (२) अन्वये अशा शिक्षेची तरतूद केली आहे कि जो व्यक्ती नोंदणीकृत फार्मासिस्ट नाही आणि जो कलम ४२ (१) चे उल्लंघन करेल त्याला सहा महिन्यांपर्यंतच्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपेक्षा जास्त नसेल इतक्या दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकते.

५.११ पी.सी.आय. ने, दि फार्मसी ॲक्ट अन्वये त्याच्याकडे विहित असलेल्या अधिकाराचा वापर करुन भारतामध्ये, किमान शैक्षणिक पात्रता विहित करण्यासाठी तसेच भारतामध्ये फार्मसी या विषयाचे नियमन करण्यासाठी अनेक विनियम तयार केले आहेत, ज्यामध्ये खालील नियमांचा समावेश आहे.

(अ) एज्युकेशन रेग्युलेशन्स (शिक्षण विनियम) १९९१,

(बी) फार्म. डि रेग्युलेशन्स, २००८

(सी) फार्मसी संस्थांमधील शिक्षकांसाठी किमान अर्हता विनियम, २०१४

(डी) बॅचलर ऑफ फार्मसी (फार्मसी स्नातक) बी. फार्म अभ्यासक्रमाचे विनीयम, २०१४

(इ) मास्टर ऑफ फार्मसी (एम. फार्म.) अभ्यासक्रमाचे नियम, २०१४

(एफ) बॅचलर ऑफ फार्मसी (व्यवसाय) विनियम, २०१४

(जी) फार्मसी व्यवसाय विनियम, २०१५

५.१२ अशा तऱ्हेने उपरोल्लिखित सांविधिक योजना हि फार्मसीचे क्षेत्र सर्व तपशीलांसहित व्याप्त आणि व्यापक असल्याचे स्पष्टपणे दर्शवते. पुढे असे सादर करण्यात आले कि केवळ फार्मसी ॲक्ट च्या तरतुदींनीच नव्हे तर त्या अन्वये केलेल्या सांविधिक नियम आणि विनिमयांव्दारे देखील त्याचे नियमन केले जाते, ज्याव्दारे फार्मसी विषयावरील एक परिपुर्ण संहिता उपलब्ध होते.

५.१३ फार्मसी ॲक्ट अधिनियमीत करण्यामध्ये, फार्मसीस्ट म्हणुन नोंदणीकृत होण्यासाठी आवश्यक असलेल्या अर्हता प्रत्यक्ष फार्मसी व्यवसाया करणे या दोन्ही बाबत सदर व्यवसायाचे सुलभ नियमन होत आहे याची खाची करणे हो वैधानिक हेतू होता. पुढे असे सादर करण्यात आले कि संसदेने , इतर गोष्टीबरोबरच कायदेविषयक व्यवसाय (बार कॉन्सिल ऑफ इंडिया), वैदयकिय व्यवसाय (आर्किटेक्चर कॉन्सिल ऑफ इंडिया) नर्सिंग (नर्सेस कॉन्सिल ऑफ इंडिया)[ आणि (डेंटल कॉन्सिल ऑफ इंडिया) याबाबतीत ही याच योजनेचा स्विकार केला आहे. आणि त्यामुळे फार्मसी ॲक्ट हा फार्मसी विषय/क्षेत्राबाबतचा विशेष कायदा आहे.

५.१४ तर दुसरीकडे ए.आय.सी.टी.ई. ॲक्ट चा हेतू हा केवळ तांत्रिक शिक्षणाच्या क्षेत्रात दर्जा राखला जातो का याची खात्री करणे हा असून, सदर ॲक्ट चा उद्येश विशेष शिक्षणाच्या सर्व बाबतील नियमांचे नियत्रंण करणे, ज्याकरीता विशेष नियंत्रण संस्था आपापल्या कायदयाअंतर्गत आगोदरपासुन कार्यरत आहेत, हा नव्हे .पुढे असे सादर करण्यात आले कि, ए.आय.सी.टी. ई. ॲक्ट च्या उद्यिष्टे व कारणांच्या विवरणपत्राचे अवलोकन करता अस दिसून येते कि ए.आय.सी.टी.ई. ही संस्था इंजिनिअरिंग (अभियांत्रिकी) आणि तत्सम तांत्रीक विषयातील धोरणांच्या संदर्भात  केंद्र सरकारला सहाय्य आणि मार्गदर्शन करीत आली आहे आणि कोणत्याही प्रकारे इतर सांविधकि संस्थांची स्वायत्तता आणि अधिकार सौम्य करण्याकरीता तिची निर्मिती करण्यात आलेली नाही. पुढे असे सादर करण्यात आले कि हि संस्था कोणाही व्यावसायीकाच्या नोंदणीसाठी आणि तो व्यवसाय

चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या अभ्यासक्रमाचे व्यवस्थापन करीत नाही, आणि या संस्थेकडे वैदयकिय, दंतवैदयकिय, वास्तूशास्त्र तसेच फार्मसी ( औषधनिर्माण शास्त्र ) या विषयातील कोणताही अधिकारीता नाही.

५.१५ भारथीदासन युनिव्हर्सीटी वि. ऑल इंडिया कॉन्सिल फॅार टेक्निकल एज्युकेशन (ए.आय.सी.टी.ई) (२००१) ८ एन सी सी ६७६ या प्रकरणी न्यायलयाने ए.आय.सी.टी. ई.च्या अधिकारांची व्याप्ती आणि ए.आय.सी.टी.ई. ॲक्ट चा वैधानिक उद्येश याबाबत स्पष्टीकरण दिले आहे आणि परिच्छेद क्र. ८ आणि १० यावरा खूप भरवसा ठेवला आहे.

५.१६ त्यामुळे ए.आय.सी.टी.ई. ॲक्ट चा वैधानिक उद्येश स्पष्ट होतो कि या कायदयाचि उद्येश अस्तित्वात असलेल्या नियामक संस्थाची जागा घेणे किंवा त्यांना निष्प्रभावित करणे हा नसून केवळ सल्लागार या नात्याने देशभरात तांत्रिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यावर लक्ष केद्रिंत करुन समन्वय साधणे हा आहे. म्हणुन पुढे असे सादर करण्यात येते कि, फार्मसी शिक्षणाच्या नियमनामध्ये, फार्मसी ॲक्ट अन्वये, पीसीआय हि संस्थाच यापुढेही शैक्षणिक संस्थांची नियामक म्हणून कार्यरत राहील आणि फार्मसी क्षेत्रातील शैक्षणिक संस्थच्या नियमनासंदर्भात, फार्मसी विषयाशी संबंधीत विशेष कायदा म्हणून फार्मसी ॲक्ट च्या तरतूदी या, तांत्रिक शिक्षणासाठी असलेल्या सर्व साधारण कायदयातील, ए.आय.सी.टी.ई. ॲक्ट मधील तरतुदींपेक्षा वरचढ असतील.

५.१७ तसेही, फार्मसी विषयावरील विशेष कायदा असल्याकारणाने फार्मसी ॲक्ट हा ए.आय.सी.टी.ई. ॲक्टवर प्रभावी ठरतो. पुढे असे सादर करण्यात आले कि, कोणत्याही विषयावरील विशेष कायदा हा सदर विषयाचा केवळ अनुशंगिक परामर्श घेणाऱ्या सर्वसाधारण कायदयापेक्षा प्रभावी ठरतो हे कायदयाने मान्य केलेले तत्व आहे आणि हेच कायदयाचे तत्व 'जनरालीया स्पेशियालबिस नॉन डेरोगन्ट' म्हणजेच विशेष तरतूदी या सर्वसाधारण तरतुदींचेच नियंत्रण करतील किंवा सर्वसाधारण तरतुदी या विषेश तरतुदींचे श्रेय कमी करत

नाहीत, या विधीसूत्रामध्ये जतन केलेले आहे. पुढे असे सादर केले आहे कि नंतर केलेला कायदा हा आधीच्या कायदयापेक्षा प्रभावी ठरु शकतो हा या तत्वाचा अपवाद आहे आणि म्हणून आधीचा विशेष कायदा हा नंतरच्या सर्वसाधारण कायदयापेक्षा प्रभावी ठरतो. वरील निवेदनाच्या पुष्यर्थ, युपीएसईबी वि. हरिशंकर जैन (१९७८)४ एस सी सी १६, एल आय सी ऑफ इंडिया वि. डि.जे बहादुर (१९८१)१ एससीसी ३१५ आणि याकूब अब्दुल रज्जाक मेमन वि. महाराष्ट्र शासन (२०१३) १३ एससीसी–१ या प्रकरणातील या न्यायालयाच्या निर्णयांचा प्रामुख्याने आधार घेण्यात आला.

५.१८ वरिल निर्णयांचा आधार घेत पुढे असे म्हणणे मांडले कि कोणत्याही संघर्षच्या स्थितीत फार्मसी ॲक्ट, जो फार्मसी या विशेष विशयांशी संबधीत असलेला विशेष कायदा आहे तो, तांत्रिक शिक्षणाच्या क्षेत्रातील सर्वसाधारण कायदा असलेल्या ए.आय.सी.टी.ई. अ◌ॅक्ट वर प्रभावी ठरेल.

५.१९ आणि उत्तरवादीच्या वतीने ' इंम्प्लार्ड्इड रिपील ' या तत्वावर आधारित केलेली निवेदने देखील पूर्णपणे चुकीचा अर्थ लावलेली व चुकीची आहेत.पुढे असे सादर करण्यात आले कि म्युनिसीपल कॉन्सिल वि. टि.जे. जोसेफ (१९६४) २ एस.सी.आ. ८७ या प्रकरणी या न्यायालयाने असा निकाल दिला कि जेव्हा वेगवेगळ्या वेळी संविधाने एकाच विषयासंबंधी दोन वेगवेगळे कायदे केले असतील तेव्हा नंतरच्या कायदा हा आधीचा कायदा रद्द् ठरवितो असे गृहीत धरण्यात येत नाही. बैराम पेस्तनजी गारीवाला वि. युनियन बँक ऑफ इंडिया (१९९२)१ एस.सी.सी. ३१ या प्रकरणातील या न्यायालयाच्या निकालाचाही आधार घेण्यात आला. वरील निकालात न्यायालयाने असा निर्णय दिला कि ' इंम्प्लार्ड्इड| रिपील ' हे तत्व लागू करुन कायदयातील कोणताही मूलभूत बदल/फेरफार गृहित धरता येणार नाही आणि पुढे म्हटले आहे कि कायदयातील कोणताही मूलभूत बदल/फेरफार हा फक्त स्पष्ट शब्दांनीचा केला जाऊ शकतो. केवळ एका बाजुने गृहित धरुन नव्हे. त्यामुळे, वरिल निर्णयामध्ये 'इंम्प्लार्ड्इड रिपील' या आधारावर केलेले कथन फेटाळण्यात आले.

५.१९.१ त्यामुळे उद्दिष्टे आणि कारणांच्या विवरणपत्रासंबधाचे तसेच ए.आय.सी.टी.ई. ॲक्ट च्या योजनेसंबधाने त्याचप्रमाणे भारतीदर्सन (सुप्रा) प्रकरणातील न्यायानिर्णयाच्या परिच्छेद क्र.८ मध्ये खुलासा केल्याप्रमाणे संसदेचा, सध्या अस्तित्वात असलेल्या पध्दतीमध्ये, ज्यामध्ये किमान शैक्षणिक दर्जा विहित करण्याच्या व अभ्यासक्रमाला मान्यता देण्याच्या टप्प्यापासून ते फर्मासिस्ट ची नोंदणी व त्यांच्या भविष्यातील व्यावसायिक वर्तनाचे संनियंत्रण करण्याच्या टप्प्यापर्यंतची सर्व अधिकारीता व शक्ती फार्मसी ॲक्ट अन्वये पीसीआय कडे निहित आहे. त्यांत मूलभूत बदल करण्याचा कोणताही उद्देश नाही.

५.१९.२ आणि तसेही याबाबत ए.आय.सी.टी.ई. ॲक्ट ने कोणत्याही प्रकारे पीसीआय ची अधिकारीता आणि शक्ती यांस बाधा पोहोचवीली असे मानता येणार नाही आणि त्यामुळे पुढे असे सादर करण्यात आले कि ए.आय.सी.टी.ई. ॲक्ट ने फार्मसी ॲक्ट ला निरसित केले असा अर्थ काढता येणार नाही आणि या विरुध्द असलेले कोणतेही कथन या न्यायालयाकडुन फेटाळले जाण्यास पात्र आहे,

५.१९.३ त्यामुळे कोणत्याही स्पष्ट अथवा ध्वनित वैधानिक हेतूच्या अभावी ए.आय.सी.टी.ई. ॲक्ट ने फार्मसी ॲक्ट निरसित केला असल्याचे मानता येणार नाही आणि याउलट फार्मसी या विषयाचा सर्वसमावेशक विचार करणार विशेष कायदा म्हणून फार्मसी ॲक्ट च्या तरतूदी या ए.आय.सी.टी.ई अॅक्ट च्या तरतूदींवर प्रभावी ठरतील.

५.२० या न्यायालयाने, एसएलपी (सी) डायरी क्र. २४७९८ / २०१८ – प्रोग्रेसीव्ह एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ फार्मसी वि. महाराष्ट्र राज्य (दि. २४.०७.२०१८) हे प्रकरण निकालात काढताना असे म्हणणे मांडले कि, “भारत सरकारने, ए. आय.सी.टी.ई. ॲक्ट च्या कलम २ (ग) मधील व्याख्येचा पुनर्विचार करणे इष्ट ठरेल जसे कि त्यात फार्मसी या विषयाचा समावेश केला जाऊ शकतो का, जो याआगोदरच फार्मसी ॲक्ट मध्ये समाविष्ट आहे.” पुढे असे सादर करण्यात आले कि, वास्तविक त्यानंतर दि. ३०.०९.२०१९ रोजी,

आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्री भारत सरकार, आणि मनुष्य बळ विकास मंत्री भारत सरकार यांच्यात झालेल्या आंतर – मंत्रालयीन बैठकीत असा निर्णय घेण्यात आला कि ए.आय.सी.टी.ई. ॲक्ट अन्वये अंतर्गत "तांत्रीक शिक्षणाच्या" व्याख्येतून 'फार्मसी' हा शब्द वगळण्यात यावा, परंतू ही सुधारणा अजून करायचची बाकी आहे. पुढे असे सादर करण्यात आले कि प्रस्तावित हायर एज्युकेशन कमिशन ऑफ इंडिया बिल, २०१९, ज्याद्वारे युजीसी आणि ए,आय,सी,टी,ई, ॲक्ट निरसित करावयाचे आहेत आणि अलाईड आणि हेल्थकेअर प्रोफेशन्स बिल, २०१८, ज्याद्वारे आरोग्य आणि संलग्न ५३ व्यवसायाकरिता उदा. फिजिओथेरपिस्ट्स, रेडिओलॉजस्ट्स, न्यूट्रिशनिस्ट्स इ. करिता एक नियामक व्यवस्था अस्तित्वात आणावयाची आहे त्याचा पीसीआय शी काहीही संबंध नाही. पुढे असे सादर करण्यात आले कि वैयकिय, दंतवैदयकिय, फार्मसी आणि नर्सिंग विषयाशी संबंधीत चारही कॉन्सिल्स (परिषदा) आपापली कर्तव्ये आणि कार्ये, विशेष कायदयाअंतर्गत सुरु ठेवतील.

५.२१ उत्तरवादी महाविदयालये आणि ए.आय.सी.टी.ई. ॲक्ट यांनी सादर केलेले, पीसीआय हे केवळ फार्मसी विषयातील पदविका प्रदान करण्याचे नियमन करु शकते आणि पुढील अभ्यासक्रम / अर्हता नव्हे, या अर्थाचे निवेदन हे फार्मसी ॲक्टच्या कलम १२ आणि ३५ अन्वये केलेल्या विशेष तरतूदी लक्षात घेता पूर्णपणे चुकिचे, चुकीचा अर्थ लावणारे आणि कायदयाने न टिकण्याजोगे आहे. पुढे असे सादर करण्यात आले कि कलम १२ आणि ३५ मधील तरतूदी हे स्पष्ट करतात कि फार्मसीशी संबंधीत सर्व अभ्यासक्रम म्हणजे जे फार्मसी ॲक्ट च्या योजनेअंतर्गत समाविष्ट होतात ते.

५.२२ ए.आय.सी.टी.ई. आणि पीसीआय मधील संघर्षाचे प्रमुख कारण हे होते कि, पीसीआयने ज्या अभ्यासक्रमासाठी विदयार्थी संख्या ठरवून दिली होती त्या अभ्यासक्रमांसाठी ए.आय.सी.टी.ई. ने महाविदयालयांना विदयार्थी संख्या दुप्पट करण्याची परवानगी दिली होती त्याचप्रमाणे पीसीआयच्या नियमांच्या

विरुध्द ए.आय.सी.टी.ई. ने दुसऱ्या पाळीसाठी (संध्याकाळच्या वर्गासाठी) परवानगी दिली होती.

५.२३ शिवाय नुकताच या न्यायालयाने श्री प्रिंस शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे कॉलेज ऑफ आर्किटेक्चर या प्रकरणात निकाल दिलेला असताना देखील ए.आय.सी.टी.ई. ने एक जाहिर नोटीस प्रसिध्द केली आहे ज्यात, ए.आय.सी.टी.ई. अजूनही आर्किटेक्चर च्या अभ्याक्रमांना मान्यता प्रदान करण्याकरीता अर्ज मागवित असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे, सदरची जाहीर नोटीस देखील उघड – उघड या न्यायालयाच्या न्यायनिर्णय आणि आदेशाच्या विरोधात आहे आणि अशी नोटीस म्हणजे या न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा जाणूनबुजून भंग करणे आहे.

५.२४ वरिल निवेदनाद्वारे आणि वरील निर्णयांचा आधार घेत अशी विनंती करण्यात येते कि, प्रस्तुतच्या याचिका मान्य (दाखल करुन घेण्यात) करण्यात याव्यात आणि असा निर्णय देण्यात यावा कि फार्मसी विषयाचे शिक्षण आणि फार्मसीचा व्यवसाय करणे या सर्व बाबीशी संबंधीत नियमन करण्याची अधिकारीता आणि अधिकार पीसीआय कडे आहेत आणि ए.आय.सी.टी.ई. कडे त्याबाबतीत कोणतीही अधिकारीता किंवा अधिकार असणार नाही. पुढे अशीही विनंती करण्यात येते कि ए.आय.सी.टी.ई. ॲक्ट च्या कलम २ (ग) मधील 'फार्मसी' हा शब्द, फार्मसीचे शिक्षण आणि फार्मसीचा व्यवसाय करणे याचे नियमन करण्याच्या संबंधाने गैरलागू समजला जाण्यास पात्र आहे असा निर्णय देण्यात यावा.

**ए.आय.सी.टी.ई. चे निवेदन :–**

६. एआयसिटीई तर्फे उपस्थित विद्वान वकिल श्री. हरिश पांडे, यांनी खालील निवेदन सादर केले.

६.१ मुळात, एआयसिटीई ची स्थापना हि सन १९४५ च्या शासन निर्णय व्दारे, मान्यताप्राप्त दर्जाच्या अनुषंगाने तांत्रिक शिक्षण आाणि समन्वयीत विकासाची सुनिश्चिती याबाबतीत केंद्र शासन आणि राज्य शासनाला सल्ला देण्यासाठी एक राष्ट्रीय तज्ञ संस्था म्हणुन करण्यात आली होती आणि ती आपली भूमिका

उत्तम प्रकारे पार पाडीत होती. पुढे असे सादर करण्यात आले कि वाढत जाणारा खालावणारा दर्जा लक्षात घेता आणि केलेल्या शिफारषींच्या अनुंषगाने, ए.आय.सी.टी.ई. च्या भूमिकेकडे लक्ष देण्यासाठी नोव्हेंबर १९८५ मध्ये एक नॅशनल वर्किंग गृपची (राष्ट्रीय कार्यकारी गट) स्थापना करण्यात आली आणि ए.आय.सी.टी.ई. ला आपले काम परिणामकारकरित्या करता यावे याकरिता या कॉन्सिल ला सांविधीक अधिकार देण्यात यावेत अशी शिफारस केली गेली शिवाय नॅशनल पॉलीसी ऑफ एज्युकेशन (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण) १९८६ मध्ये सुध्दा अशी अट घातली होती कि सदर कौन्सिलकडे सांविधीक निहित केलेले असावेत. त्यानंतर देशातील तांत्रिक शिक्षणाच्या पध्दतीमध्ये योग्य नियोजन आणि समन्वयीत विकास सुनिश्चित व्हावा म्हणून एक विधेयक मांडले गेले. पुढे असे सादर केले कि, ए.आय.सी.टी.ई. हा कायदा, संपूर्ण देशात तांत्रिक देशात तांत्रिक शिक्षणाच्या पध्दतीमध्ये योग्य नियोजन आणि समन्वयीत विकास व्हावा या दृष्टिकोनातून ए.आय.सी.टी.ई. आस्थापनेची व्यवस्था करणे, अशा शिक्षणाच्या योजनाबध्द संख्यात्मक वाढीच्या संबंधाने त्यात गुणात्मक सुधारणेला उत्तेजन देणे आणि तांत्रिक शिक्षण पध्दती आणि त्याच्याशी संबंधीत प्रकरणांची मानके आणि दर्जा याचे नियमन व योग्य जतन करणे या हेतूने अधिनियमीत करण्यात आला. पुढे असे सादर करण्यात आले कि ए.आय.सी.टी.ई. ला दिलेले अधिकार आणि सोपविलेली कर्तव्ये हि फक्त (शैक्षणिक) मानके आणि दर्जा विहित करण्याकरीता नसून संस्था आणि त्यांच्या मार्फत राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमांच्या मान्यतेची तपासणी, परवानगी आणि ती राखून ठेवणे यासाठी देखील आहेत.

६.२ ए.आय.सी.टी.ई. ॲक्ट च्या कलम २ (ग) अन्वये "तांत्रिक शिक्षणाची व्याख्या करण्यात आली आहे ज्यामध्ये फार्मसी" चा समावेश आहे. ए.आय.सी.टी.ई. च्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांनी ए.आय.सी.टी.ई. च्या विविध तरतूदिंबद्दल समजावून सांगीतले आहे. आणि पुढे असे सादर करण्यात आले आहे कि म्हणून ए.आय.सी.टी.ई. ॲक्ट हा, त्यातील कलम २ (ग) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, तांत्रीक शिक्षणाच्या क्षेत्रात,

तांत्रीक शिक्षण आणि शैक्षणिक संस्थांचे नियमन करण्यासाठभ्‍ आणि त्यांचा किमान दर्जा ठरविण्यासाठी अधिनियमीत करण्यात आला आहे. पुढे असे सादर करण्यात आले आहे कि ए.आय.सी.टी.ई. ॲक्ट मध्ये, अशा संस्थांचे नियमन करणे सर्व अधिकार त्यातील नियम आणि विनियमांचे पालन करण्यात कसूर केल्यास त्यावर कारवाई करण्याच्या आणि दिलेली मान्यता काढून घेण्याच्या अधिकारासह देण्यात आले आहेत.

६.३ जोपर्यंत फार्मसी अॅक्ट चा संबंध आहे, तो सन १९४८ मध्ये अधिनियमीत केलेला संविधान पूर्व कायदा आहे जो फार्मसी व्यवसायाचे नियमन करण्यासाठी अधिक चांगल्या तरतूदी करण्याच्या मुख्य उद्येशाने आणि त्याकरीता फार्मसी कॉन्सिल स्थापित करण्याकरीता अधिनियमीत करण्यात आला होता. पुढे असे सादर करण्यात आले कि फार्मसी अॅक्ट ची धेय्ये, उद्यिष्टे आणि तरतूदी यांचे अवलोकन करता असे स्पष्ट होते कि फार्मसी अॅक्ट, जो कि पूर्विचा कायदा आहे, तो मुख्यत्वे करून फक्त व्यावसायीकांचे नियमन करण्यासाठी अधिनियमीत करण्यात आला आहे. पुढे असे सादर करण्यात आले कि, ए.आय.सी.टी.ई. अॅक्ट मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे तांत्रिक शिक्षण व तांत्रीक संस्था यांचे नियमन करणे व त्यांच्याकरिता किमान दर्जा विहित करणे या एकमेव अधिकारासह, सन १९८७ मध्ये ए.आय.सी.टी.ई. ला सांविधीक दर्जा देण्यात आला. पुढे असे सादर करण्यात आले, कि ए.आय.सी.टी.ई. अॅक्ट अस्तित्वात आल्यानंतर, एखादया नविन अभ्यासक्रमाला मान्यता देणे किंवा एखादया नविन संस्थेला मान्यता देणे हे पूर्णपणे ए.आय.सी.टी.ई. कॉन्सिलच्या अखत्यारीत येते.

६.४ आणि असे कि विधीमंडळाने स्वतःच्या बुध्दिने, ए.आय.सी.टी.ई. ॲक्ट मध्ये तांत्रिकशिक्षणाच्या व्याख्येमध्ये फार्मसीचा समावेश करुन ए.आय.सी.टी.ई. ला, तांत्रिक शिक्षणाची मानके आणि दर्जा राखण्यासाठी आणि तांत्रिक शिक्षणाच्या योग्य व समन्वयीत विकासासाठी अधिकार दिले आहेत.

६.५ ए.आय.सी.टी.ई. ची भाषा एकदम साधी आणि निःसंदिग्ध आहे आणि त्यामुळे फक्त त्यातून

उदभवणाऱ्या कठोर परिणामांमुळे न्यायालय त्याचा कोणताही वेगळा अर्थ लावणार नाही. यासाठी नसिरूद्दिन वि. सिताराम अग्रवाल (२००३) २ एससीसी ५७७ या प्रकरणाचा आधार घेण्यात आला आहे.

६.६ आणि म्हणून विधिमंडळाने ए.आय.सी.टी.ई. कायदयामध्ये विनिर्देषपूर्वक समाविश्ट केलेला 'फार्मसी' हा शब्द त्यातून काढून टाकणे म्हणजे, या न्यायालयाने भारत सरकार वि. देवकिनंदन अग्रवाल (१९९२) सुप. १ एससीसी ३२३ या प्रकरणामध्ये दिलेल्या निकालाप्रमाणे अनुज्ञेय नसलेला कायदा करण्यासारखे होईल. पुढे असे सादर करण्यात आले कि, या न्यायालयाने दिलेल्या निकाला प्रमाणे, न्यायालये कायदयाचे पुनर्लेखन, नव्या स्वरूपात लिहिणे किंवा नव्याने तयार करू शकत नाही.

६.७ अजितसिंग सिंघवी वि. राजस्थान सरकार १९९१ (पुरवणी) (१) एससीसी ३४३ या प्रकरणात सदर न्यायालयाने दिलेल्या निकालाप्रमाणे न्यायालयांनी हे नेहमी गृहीत धरले पाहिजे कि विधीमंडळाने समाविष्ट केलेला कायदयाचा प्रत्येक भाग हा काही हेतूने समाविष्ट केलेला असतो आणि कायदयाच्या प्रत्येक भागाचा अपेक्षित परिणाम व्हावा हा त्यामागील सांविधीक उद्येश्य असतो. पुढे असे सादर केले कि, अजॉयकुमार बॅनर्जी वि. भारत सरकार (१९८४) ३ एससीसी या प्रकरणी सदर न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार मागाहून केलेला कायदा प्रचलित होतो. त्यामुळे पुढे असे सादर करण्यात आले कि ए.आय.सी.टी.ई. अॅक्ट, जो नंतर केलेला कायदा आहे तो फार्मसी अॅक्ट पेक्षा प्रभावी ठरेल.

६.८ संविधानाच्या कलम ३७२ मध्ये अशी तरतूद केलेली आहे कि, कलम ३९५ मध्ये संदर्भित केलेल्या अधिनियमाचे या संविधानाद्वारे निरसन झाले असेल तरी या संविधानाच्या लगतपूर्वि भारताच्या राज्यक्षेत्रात अंमलात असलेले सर्व कायदे, सक्षम प्राधिकाऱ्याकडून (संसदेकडून) त्यात फेरफार केला जाईपर्यंत किंवा त्याचे निरसन केले जाईपर्यंत किंवा त्यात सुधारणा केली जाईपर्यंत, यादी – १ (युनियन लिस्ट संघ सूची) नोंद – ६६ अन्वये अंमलात असण्याचे चालू राहिल. पुढे असे सादर करण्यात आले कि, ए.आय.सी.टी.ई. अॅक्ट

हा संसदेद्वारे संघसूची अन्वये अधिनियमीत करण्यात आला आहे ज्यामध्ये आगोदर केलेल्या १९४८ च्या कायदया अन्वये समाविष्ट असलेली सर्व क्षेत्रे समाविष्ट आहेत उदा. फार्मसी च्या क्षेत्रातील शिक्षणासाठी मानके आणि दर्जा ठरवणे. पुढे असे सादर करण्यात आले कि घटनेच्या कलम ३७२ अनुसार सन १९८७ चा कायदा, जोपर्यंत त्यामध्ये, सध्या अस्तित्वात असलेल्या सन १९४८ च्या कायदयामध्ये समाविष्ट असलेल्या सर्व बाबी समाविष्ट होतात, त्यामर्यादेपर्यंत प्रभावी राहील आणि सन १९४८ च्या कायदयातील तरतूदी त्या मर्यादेपर्यंत निरसित/बदललेल्या राहतील.

७. पुढे असे सादर करण्यात आले कि, जोपर्यंत अर्जदारांच्या विद्वान वकिलांनी आधार घेतलेल्या भारथीदर्शन (सुप्रा) या प्रकरणातील सदर न्यायालयाने दिलेल्या निकालाचा संबंध आहे, तो प्रस्तुतच्या प्रकरणातील वस्तुस्थितीला अजिबात लागू होत नाही. पुढे असे सादर करण्यात आले कि मुळामध्ये युजीसी आणि ए.आय.सी.टी.ई. च्या तुलनेत युनिव्हर्सिटीज चे अधिकार याबाबतत वाद होता आणि ए.आय.सी.टी.ई. अॅक्ट च्या कलम २ (एच) दिलेल्या "तांत्रिक संस्था" (तंत्रशिक्षाणसंस्था) या व्याख्येमधून युनिव्हर्सिटिजना वगळण्यात आलेले आहे आणि म्हणून या न्यायालयाने असा निकाल दिला कि ए.आय.सी.टी.ई. ला यूनिव्हर्सिटीज पेक्षा जास्त अधिकारीता नाही. पुढे असे सादर करण्यात आले कि, ए.आय.सी.टी.ई. च्या विविध कलमांतर्गत आणि व्याख्येमध्ये फार्मसी चा जाणीवपूर्वक समावेश करण्यात आला आहे.

७.१ पुढे असे सादर करण्यात आले कि जोपर्यंत पीसीआय च्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांनी आधार घेतलेल्या श्री प्रिंस शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे आर्किटेक्चर कॉलेज (सुप्रा) या प्रकरणातील सदर न्यायालयाने दिलेला निकालाचा संबंध आहे, तो अनाठायी आहे कारण तो मुख्यत्वेकरून या न्यायालयाने, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ प्राईवेट कॉलेजेस वि. ऑल इंडिया कॉन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन (२०१३) एससीसी ३८५, या प्रकरणात दिलेल्या निकालावर आधारीत आहे, ज्यामध्ये, सदरच्या

न्यायनिर्णययातील मुद्दे मोठया खंडपीठाकडे निर्देशित करण्यात आले आहेत हि वस्तुस्थिती लक्षात घेण्यात आलेली नाही.

७.२ अन्यथा, आर्किटेक्ट अॅक्ट आणि फार्मसी अॅक्ट यामधील तरतूदींमध्ये फरक आहे.

७.३ आणि असे कि, ए.आय.सी.टी.ई. अॅक्ट, १९८७ हा फार्मसी अॅक्ट,१९४८ च्या नंतर अधिनियमीत केलेला आह आणि तो एक विशिष्ठ अधिनियम आहे जो तांत्रिक शिक्षणातील पाठयक्रम, अभ्यासक्रम प्रत्यक्ष आणि सूचनात्मक सोयी, कर्मचारी वृंद, कर्मचाऱ्यांची अर्हता, गुणात्मक सूचना, मूल्यमापन आणि परिक्षा यासाठी मानके आणि दर्जा ठरविण्याकरिता त्याचप्रमाणे नविन तंत्रशिक्षण संस्थांना मान्यता प्रदान करणे, नविन अभ्यासक्रम चालू करणे किंवा अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्रमातील विदयार्थी संस्थेमध्ये बदल करणे याकरिता अधिनियमित करण्यात आला आहे. पुढे असे सादर करण्यात आले कि त्यामुळे "ध्वनित निरसन" या तत्वाच्या आधारावर, फार्मसी अॅक्ट पेक्षा ए.आय.सी.टी.ई. च्या तरतूदी प्रभावी ठरतात.

७.४. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी चे कॉलेज ऑफ फार्मसी (सुप्रा) प्रकरणी सदर न्यायालयाने दिलेल्या निकालास अनुसरून, आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्री व मानव संसाधन विकास मंत्री यांच्यात झालेल्या बैठकीमध्ये, ए.आय.सी.टी.ई. अॅक्ट च्या कलम २ (ग) मध्ये अंतर्भूत असलेल्या 'तांत्रिक शिक्षणाच्या व्याख्येमधून' "फार्मसी" ला वगळून ''तांत्रिक शिक्षणा' च्या व्याख्येचा पुर्नविचार करावा असे ठरविण्यात आले. परंतू पुढे असे सादर करण्यात आले कि, जोपर्यंत त्यात सुधारणा केली जात नाही तोपर्यंत, दोन्ही कॉन्सिल्स, मान्यता प्रदान करण्याकरिता, एकत्रितपणे तपासणी करतील आणि दोन्ही पक्षकार त्यांनी दाखल केलेली प्रकरणे काढून घेतील.

७.५. वरिलप्रमाणे निवेदन सादर केल्यानंतर, सदर प्रकरणी अंतर्भूत असलेले प्रश्न/मुद्दे ए.आय.सी.टी.ई. च्या बाजूने निकाली काढून ए.आय.सी.टी.ई. अॅक्ट मधील तरतूदी या फार्मसी अॅक्ट च्या तरतूदींपेक्षा प्रभावी

राहातील असा निकाल दयावा अशी विनंती करण्यात आली.

**<u>इतर निवेदने :-</u>**

८. तसेही, एसएलपी (सी) क्र. ४१२४ - ४१२७ / २०१६ प्रकरणी, उत्तरवादी क्र. ५ तर्फे उपस्थित असणारे विद्वान वकिल यांनी ए.आय.सी.टी.ई. च्या भुमिकेला पाठींबा दर्शविला आहे. पुढे असे सादर करण्यात आले आहे कि फार्मसी अॅक्ट आणि ए.आय.सी.टी.ई. अॅक्ट, या दोन्हीचा योग्य तो मेळ घालून अर्थ लावण्याचे प्रयत्न करण्यात यावेत आणि या दोन्ही कायदयामधील तरतूदींचा मेळ घालण्याचे प्रयत्न केले जावेत.

८.१. उत्तरवादी क्र.५ च्या वतीने उपस्थित विद्वान वकिल यांनी पुढे असे सादर केले कि उत्तरवादी क्र. ५ यांचे, पीसीआय च्या अभ्यासक्रम आणि फार्मासिस्ट म्हणून नोंदणीसाठीची परिक्षा विहित करणे, त्यास मंजूरी देणे व मान्यता देणे व नियमन करणे या अधिकाराबाबत दुमत नाही. परंतू त्यांनी पुढे असे सादर केले की यांत पीसीआय चे अधिकार आणि त्यांची भूमिका मर्यादित स्वरूपाची आहे आणि त्यांचे अधिकार हे केवळ फार्मसी विषयातील पदविकेपुरते मर्यादित आहेत, इतर कोणत्याहि अभ्यासक्रमाच्या बाबतीत नाही. पुढे असे सादर करण्यात आले कि फार्मसी अॅक्ट अंतर्गत पीसीआय ला संस्थांवर थेट नियंत्रण प्रदान करण्यात आलेले नाही आणि पुढे असे सादर करण्यात आले ए.आय.सी.टी.ई. अॅक्ट ने सदर पोकळी भरून निघाली आहे.

८.२. पुढे असे सादर करण्यात आले कि, जोवर (विदयार्थी) प्रवेश संख्येचा संबंध आहे, पदविका अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा एज्युकेशन रेग्युलेशनन १९९१ (शैक्षणिक विनियम) अन्वये घालून देण्यात आल्या आहेत. पुढे असे सादर करण्यात आले कि ए.आय.सी.टी.ई. ला, पायाभूत आवश्यकतांच्या पूर्ततेनंतर, प्रवेश संख्या वाढीबाबत निर्णय घेण्याचा अधिकार आहे. त्यामुळे, एज्युकेशन

रेग्युलेशन्स अंतर्गत घालून दिलेल्या पायाभूत सुविधांच्या पूर्ण पूर्ततेनंतर देखील ए.आय.सी.टी.ई., त्यांच्या स्वतःच्या मानकांप्रमाणे इतर कोणत्याही बाबींची पूर्तता करण्याचा आग्रह धरू शकतात. पुढे असे सादर

करण्यात आले कि फार्मसीचा व्यवसाय, अभ्यासक्रम आणि परिक्षा यांच्या नियमनाकरीता पीसीआय ला सर्वाधिकार असतील आणि इतरबाबींसाठी ए.आय.सी.टी.ई. आणि त्यातील विनियम प्रभावी राहतील. त्याचप्रमाणे जोवर फार्मसी व्यवसायाचा संबंध आहे, फार्मसी अॅक्ट हा एक विशेष कायदा आहे आणि तंत्रशिक्षण संस्थांच्या विनियमनाबाबत ए.आय.सी.टी.ई. हा विशेष कायदा राहील आणि म्हणून तो अंमलात राहील.

८.३. वरिलप्रमाणे निवेदन सादर केल्यानंतर, उत्तरवादी क्र. ५ च्या बाबतीत ए.आय.सी.टी.ई. ने मान्यता दिलेल्या प्रवेशसंख्येला संरक्षण देण्यात यावे अशी विनंती करण्यात आली.

९. प्रत्येक संस्थेच्या वतीने उपस्थित असणाऱ्या विद्वान वकिलांनी पुढे असे सादर केले कि ए.आय.सी.टी.ई. च्या निर्णयाप्रमाणे प्रत्येक संस्थेला अंतरिम आदेशाद्वारे, जो काही संस्थांच्या बाबतीत अंतीम आदेश आहे, विदयार्थी संख्या वाढविण्यास परवानगी देण्यात आली आहे आणि विदयार्थ्यांनी त्याप्रमाणे शिक्षण घेतलेले आहे आणि उच्च न्यायालयांनी विदयार्थांच्या हितासाठी अंतरीम आदेश पारीत केले होते त्यामुळे सदर प्रत्येक प्रकरणाचा निकाल काहीही लागला तरीहि विदयार्थी आणि संस्था यांचे हित जपले जावे.

१०. प्रत्युत्तरामध्ये, पीसीआय च्या वतीने उपस्थित असणारे विद्वान वरिष्ठ वकिल यांनी असे सादर केले आहे कि असेही आर्किटेक्टस् अॅक्ट १९७२ आणि फार्मसी अॅक्ट १९४८ मधील तरतूदी, फक्त कलम १७ मधील नॉन ऑबस्टीनेट खंड वगळून एकसारख्या आणि पॅरा मटेरिआ आहेत, परंतु पुढे असे सादर करण्यात आले आहे की, आर्किटेक्टस् अॅक्ट मधील कलम १७ चे अवलोकन करता पुरेसे स्पष्ट होते की, सदर तरतुदीचा वास्तुशास्त्र परिषदेच्या वास्तुशास्त्र क्षेत्रातील शिक्षणाचा किमान दर्जा विहीत अधिकाराशी कसलाही संबंध नाही आणि सदर नॉन ऑबस्टीनेट तरतुद ही फक्त नोंदणीशी संबंधित आहे. जसे कि, वास्तुशास्त्राचा व्यवसाय करणे, वास्तुशास्त्र कायदयाअंतर्गत नोंदणी करणे अनिवार्य असेल. त्यामुळे पुढे असे

सादर करण्यात आले कि, फार्मसी अ्ॅक्ट मध्ये अशा प्रकारची मिळतीजुळती तरतूद नसणे याचा प्रस्तुत प्रकरणी अंर्तभूत असलेला मुदद्यांवर निकाल देतांना कसलाही परिणाम किंवा प्रभाव असणार नाही.

११. ए.आय.सी.टी.ई. च्या वतीने उपस्थित असणारे विद्वान वकिल, यांनी संविधानाच्या कलम ३७२ चा घेतलेला आधार पाहता, पीसीआय च्या वतीने उपस्थित असणारे विद्वान वरिष्ठ वकिल श्री. मनिंदर सिंग यांनी जोरदारपणे सादर केले की, संविधानाच्या कलम ३७२ नुसार सुद्धा, जोपर्यंत एखादा संविधान पूर्व कायदा विशेष करून निरसित केला जात नाही तोपर्यंत तो वापरात असणे चालू राहते आणि प्रस्तुत प्रकरणी फार्मसी अ्ॅक्ट १९४८ हा निरसित न झाल्यामुळे तो भारतभर वापरात असणे चालू राहते.

**<u>आमचे विचार :-</u>**

१२. वरील निरीक्षण पाहता, प्रस्तुत प्रकरणांच्या गटामध्ये अंर्तभूत असलेला मुद्दा हा अभ्यासक्रमाला मान्यता देणे, फार्मासिस्ट या अर्हतेसाठी आवश्यक असलेल्या शिक्षणाचा किमान दर्जा ठरवणे, फार्मासिस्ट म्हणुन

नोंदणी करणे आणि त्यांच्या भविष्यातील व्यावसायिक वर्तकणुकीचे नियमन करणे इत्यादी मुद्दयांसह फार्मसी विषयाशी निगडित फार्मसी अ्ॅक्ट १९४८ लागू आहे कि ए.आय.सी.टी.ई. १९८७ लागू आहे या बाबतीत आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर, कोणत्याही संस्थेला फार्मसी विषयक अभ्यासक्रम चालवण्याकरिता मान्यता देण्याच्या प्रश्नावर आणि इतर संबंधित प्रकरणात, या दोन संस्थांमध्ये वाद / मतभिन्नता असल्यास, पीसीआय चा आदेश लागू राहील हा प्रश्न आहे. त्यामुळे मुद्दा हा आहे कि, ए.आय.सी.टी.ई. आणि पीसीआय यापैकी कोणती संस्था, भारतातील औषधनिर्माते क्षेत्राचे नियमन करण्याकरिता मुख्य्ःत्वे करून जबाबदार असेल.

१३. प्रस्तुत याचिकांच्या गटामधील अंर्तर्भूत असलेले मुद्ये / प्रश्न यांची उत्तरे देतांना, सर्वप्रथम याचा विचार केला जावा कि, फार्मसीच्या क्षेत्रामध्ये फार्मसी अ्ॅक्ट जो एआयसीटीई अ्ॅक्ट च्या अगोदरचा कायदा आहे,

त्याला विशेष तरतुदींसह असलेला विशेष कायदा म्हटले जाऊ शकते का? फार्मसी कायदयासाठी असलेले उद्देश व कारणांचे विवरण खालीलप्रमाणे:–

"बहुतेक इतर देशांमध्ये असते त्याप्रमाणे ज्या व्यक्तिंनी व्यावसायिक शिक्षणाचा किमान दर्जा प्राप्त केला असेल अशा व्यक्तिंनाच फकत फार्मसीचा व्यवसाय करण्याची अनुमती देणे इष्ट असेल. त्या अनुशंगाने फार्मसीची केंद्रीय परिषद स्थापन करण्याचे प्रस्तावित करण्यात आले, जी परिषद किमान शैक्षणिक दर्जा विहीत करेल, फार्मासिस्टस करिता अभ्यासक्रम आणि परिक्षा यांना मान्यता देईल आणि प्रादेशिक फार्मसी परिषदा ज्या अर्हताप्राप्त फार्मासिस्ट्स च्या क्षेत्रिय नोंदवहया सुस्थितीत ठेवण्यासाठी जबाबदार असतील. पुढे, प्रादेशिक सरकारांना, नोंदणीकृत फार्मासिस्ट च्या प्रत्यक्ष आणि व्यक्तीशः देखरेखीखाली असल्याशिवाय वैदयकीय व्यावसायिकाच्या औषधपत्रानुसार कोणत्याही प्रकारचे औषध देण्यास मनाई करण्याचे अधिकार देण्याचे प्रस्तावित करण्यात आले." फार्मसी अॅक्ट १९४८ च्या प्रस्तावनेप्रमाणे, फार्मसी कायदा हा फार्मसी व्यवसायाच्या नियमनाकरिता अधिक चांगल्या तरतुदी करण्यासाठी आणि फार्मसी परिषदांचे गठन करण्याचा उद्देशाने अधिनियमित करण्यात आला आहे. फार्मसी कायदयामधील संबंधित तरतुदींचा विचार करिता, त्यामध्ये सर्व क्षेत्रांचा अंर्तभाव आहे जसे कि, अभ्यासक्रमास मान्यता देणे, अभ्यासक्रमाचा मजकूर निश्चित करणे, शिक्षक तसेच विदयार्थी यांच्या पात्रतेच्या अटी ठरविणे, परिक्षेच्या दर्जाचे मुल्यमापन करणे, नोंदणी मंजूर करणे, उच्चतम अर्हतेची नोंद करणे, गैरवर्तणुकीबाबत कार्यवाही करणे इत्यादी. फार्मसी अॅक्ट मधील सदर संबंधित तरतुदी या कलम १०, १२, १३, १६,२९, ३२, ३५,३६ आणि ४२ या अन्वये नमूद आहेत.

१३.१. फार्मसी अॅक्ट चा कलम १० हा पीसीआयला, फार्मासिस्ट म्हणून अर्हता धारण करण्यासाठी आवश्यक असलेल्या शिक्षणाचा किमान दर्जा विहित करणारे शैक्षणिक विनियम तयार करण्याची शक्ती प्रदान करतो. आणि कलम १० च्या पोट कलम (२) अनुसार, असे शैक्षणिक विनियम खालील बाबी विहित करू

शकतात:–

(अ◌े) अभ्यासाचे स्वरूप व कालावधी आणि परिक्षेला प्रवेश मिळण्याआधी घ्यावयाचे व्यावहारिक प्रशिक्षण.

(बि) मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विदयार्थांना पुरविण्यात येणारी साधन सामग्री आणि सोयी–सुविधा.

(सी) परिक्षेचे विषय आणि त्यात प्राप्त करावयाचा दर्जा.

(डी) परिक्षेसाठी प्रवेशाच्या इतर अटी.

फार्मसी अ◌ॅक्ट च्या कलम १२ अनुसार, राज्यातील कोणतेही 'प्राधिकरण', ज्याला फार्मसी विषयाचे अभ्यासक्रम चालविण्याची शक्ती प्रदान करण्यात आली आहे ते, शैक्षणिक विनियमानुसार अभ्यासक्रमाला मान्यता मिळावी म्हणुन केंद्रिय परिषदेकडे (सेंट्रल कौन्सिल) अर्ज करू शकते. त्याचप्रमाणे, जे प्राधिकरण राज्यात फार्मसी विषयाच्या परिक्षेचे आयोजन करते ते, पीसीआय कडे अशा परिक्षेच्या मान्यतेसाठी अर्ज करू शकते. ज्या विदयार्थ्याने असा मान्यता प्राप्त अभ्यासक्रम पूर्ण केला असेल/ त्यात उत्तीर्ण झाला असेल आणि अशा मान्यताप्राप्त परिक्षेस उत्तीर्ण झाला असेल तोच केवळ, इतर आवश्यक बाबी पूर्ण करण्याच्या अधीन राहून, फार्मासिस्ट म्हणून नोंदणीकृत होऊ शकतो. सदर विहित केलेल्या अटिंची पूर्तता न केल्यास अशा 'अभ्यासक्रमाला' आणि 'परिक्षेला' प्रदान केलेली मान्यता काढून घेण्याचे अधिकार, फार्मसी अ◌ॅक्ट च्या कलम १३ अन्वये कार्यकारी समितीला, कोणत्याही संस्थेची, जी संस्था मान्यताप्राप्त अभ्यासक्रम उपलब्ध करून देते किंवा अशा संस्था, ज्यांनी अभ्यासक्रम किंवा परिक्षेला मान्यता मिळावी म्हणून अर्ज केलेले आहेत, अशा संस्थेची/संस्थांची तपासणी करण्यासाठी निरिक्षक नेमण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. कलम २९ हे फार्मासिस्ट्स च्या नोंदवहया तयार करणे आणि सुस्थितीत ठेवणे यासंबंधी आहे. कलम ३५

अन्वये कोणत्याही नोंदणीकृत फार्मासिस्ट संबंधी नोंदवहीमध्ये अतिरिक्त अर्हतेची नोंद करण्याची तरतूद आहे, कलम ३६ अन्वये कोणत्याही व्यक्तिस नोंदवही मधून कायमस्वरूपी किंवा तात्पुरत्या कालावधीसाठी काढून टाकण्याची तरतूद आहे. फार्मसी अॅक्ट अनुसार जोपर्यंत एखादी व्यक्ति नोंदणीकृत फार्मासिस्ट होत नाही तोपर्यंत तो किंवा ती फार्मसी अॅक्ट च्या कलम ४२ नुसार फार्मसीचा व्यवसाय करू शकणार नाही. कलम ४२ च्या पोट कलम (२) अन्वये अशा शिक्षेची तरतूद केली आहे कि एखादी व्यक्ति नोंदणीकृत फार्मासिस्ट नसेल आणि ती व्यक्ति कलम ४२ च्या पोट कलम (१) उल्लंघन करेल तर त्याला सहा महिन्यांपर्यंतच्या कारावासाची किंवा एक हजार रूपयांपेक्षा जास्त नसेल इतक्या दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

१३.२ पी.सी.आय. ने, दि फार्मसी अॅक्ट अन्वये त्याच्याकडे विहित असलेल्या अधिकारांचा वापर करून भारतामध्ये, किमान शैक्षणिक पात्रता विहित करण्यासाठी तसेच भारतामध्ये फार्मसी या विषयाचे नियमन करण्यासाठी अनेक विनियम तयार केले आहेत, ज्यामध्ये खालील नियमांचा समावेश आहे.

(अे) एज्युकेशन रेग्युलेशन्स (शिक्षण विनियम) १९९१,

(बी) फार्म. डि रेग्युलेशन्स, २००८.

(सी) फार्मसी संस्थांमधील शिक्षकांसाठी किमान अर्हता विनियम, २०१४.

(डी) बॅचलर ऑफ फार्मसी (फार्मसी स्नातक) बी. फार्म अभ्यासक्रमाचे विनीयम, २०१४.

(इ) मास्टर ऑफ फार्मसी (एम.फार्म.) अभ्यासक्रमाचे विनियम, २०१४.

(एफ) बॅचलर ऑफ फार्मसी (व्यवसाय) विनियम, २०१४.

(जी) फार्मसी व्यवसाय विनियम, २०१५.

अशा तऱ्हेने फार्मसी अॅक्ट मधील विविध तरतूदी आणि नियम लक्षात घेता, असे म्हणता येईल कि फार्मसीच्या क्षेत्रामध्ये, फार्मसी अॅक्ट स्वतःच एक परिपूर्ण संहीता आहे. पीसीआय ची स्थापना हि,

भारतामध्ये फार्मसी चा व्यवसाय व शिक्षण यांचे नियमन करण्याचे अधिकार असलेली एक संस्था म्हणून झाली आहे. फार्मसीचा विषय हा सर्वसाधारण नसून तो एक विशेष विषय आहे याबाबत काहीच वाद नाही. फार्मसी अॅक्ट मधील संबंधीत तरतुदींवरून आणि विशेषतः वर उल्लेख केलेल्या तरतूदिंवरून असे दिसून येते कि फार्मसी अॅक्ट मध्ये सर्व क्षेत्रांचा अंतर्भाव होतो ज्यामध्ये अभ्यासक्रमाला मान्यता देणे अभ्यासक्रमाचा तपशील ठरविणे, विदयार्थी आणि शिक्षक यांच्या पात्रतेच्या अटी ठरविणे, परिक्षेच्या दर्जाचे मूल्यमापन करणे, नोंदणी मंजूर करणे, समान अभ्यास क्षेत्रातील उच्चतम अर्हतेची नोंद करणे, गैरवर्तणुकीबाबत कार्यवाही करणे, इत्यादी. तसेच त्यामध्ये शिक्षेची तरतूद देखील आहे. त्यामुळे फार्मसी अॅक्ट अधिनियमीत करण्यामध्ये, सदर व्यवसायाचे एकसंध नियमन होईल याची खात्री करणे असा वैधानिक हेतू दिसून येतो. फार्मसी अॅक्ट अधिनियमीत करण्याचा उद्देष्य आणि हेतू पार पाडण्यासाठी, कायदयान्वये विधिमंडळाने फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया या स्वायत्त संस्थेची स्थापना केली. त्यामुळे फार्मसी च्या क्षेत्रामध्ये, फार्मसी अॅक्ट हा एक विशेष कायदा आहे असे म्हणता येईल.

१३.३ दुसरीकडे, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद कायदा हा तांत्रिक संस्था आणि तंत्रशिक्षण यांना लागू असलेला सर्वसाधारण कायदा म्हणता येईल. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद कायदयाचा हेतू आणि कारणांबाबतचे निवेदन विचारात घेतल्यास, त्यात असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची स्थापना प्रथमतः एका शासन निर्णयाद्वारे मान्यताप्राप्त दर्जानुसार तंत्रशिक्षणाचा समन्वित विकास सुनिश्चित करण्याकरिता केंद्र आणि राज्य शासनास सल्ला देणारे राष्ट्रीय तज्ज्ञ मंडळ म्हणून करण्यात आली होती. सदर निवेदन खालीलप्रमाणे आहे.

> "१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची स्थापना एका शासन निर्णयाद्वारे, मान्यताप्राप्त दर्जानुसार तंत्रशिक्षणाचा समन्वित विकास सुनिश्चित करण्याकरिता केंद्र आणि राज्य शासनास सल्ला

देणारे राष्ट्रीय तज्ज्ञ मंडळ म्हणून १९४५ मध्ये करण्यात आली होती. पहिल्या तीन दशकांमध्ये परिषदेचे कार्य अत्यंत परिणामकारक होते आणि या कालावधीमध्ये तंत्रशिक्षणामध्ये अभूतपूर्व विकास झाला. परंतु, मागच्या काही वर्षात, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्वांकडे पूर्णतः दुर्लक्ष करून अनेक खाजगी अभियांत्रिकी महाविदयालये आणि तंत्रविदयानिकेतने उदयास आली. यातील ब–याच संस्थांमध्ये, योग्य शिक्षण आणि प्रशिक्षण प्रदान करण्याकरिता आवश्यक अशा मूलभूत पायाभूत सुविधांचा गंभीर अभाव होता. काही अपवाद वगळता, शैक्षणिक दर्जा राखण्याकडे खूप कमी लक्ष दिले जाते.

२. वाढत जाणारा खालावणारा दर्जा लक्षात घेऊन, सन १९८१ मध्ये झालेल्या बैठकीमध्ये परिषद या निर्णयाप्रत आले की, देशातील तंत्रशिक्षणाच्या दर्जाचे नियमन करण्याकरिता आणि दर्जा राखण्याकरिता वैधानिक शक्ती निहित करण्याची परिस्थिती आली आहे. या आणि इतर शिफारशींच्या अनुषंगाने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषेदेच्या कार्यात लक्ष घालण्याकरिता, नोव्हेंबर, १९८५ मध्ये राष्ट्रीय कार्यकारी मंडळाची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय कार्यकारी मंडळाने अशी शिफारस केली की, परिषदेला आपली भूमिका परिणामकारकरीत्या पार पाडणे शक्य व्हावे याकरिता, त्यास (परिषदेस) आवश्यक वैधानिक अधिकार निहित करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, ११८६ नुसारसुध्दा, मानके आणि दर्जा यांचे नियोजन, सुसूत्रीकरण आणि जतन करण्याकरिता, मान्यता, प्राधान्यक्षेत्रास निधी पुरविणे, संनियंत्रण आणि मूल्यमापन, प्रमाणपत्रे आणि पुरस्कार यांमधील समानता राखणे, आणि तांत्रिक आणि व्यवस्थापन शिक्षणातील समन्वित आणि एकात्मिक विकास सुनिश्चित करणे यांकरिता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेला वैधानिक अधिकार निहित करण्याची अट घातली आहे.

३. सदर विधेयकादवारे, एआयसीटी ला तंत्रशिक्षणासंदर्भात,

i) संपूर्ण देशामध्ये तंत्रशिक्षण व्यवस्थेचे योग्य नियोजन आणि समन्वित विकास;

ii) योजनाबध्द संख्यात्मक वाढीच्या संबंधाने तंत्रशिक्षणातील गुणात्मक सुधारणेला उत्तेजन देणे; आणि

iii) पध्दतीचे नियमन आणि मानके व दर्जा यांचे योग्य जतन

या बाबी सुनिश्चित करण्याकरिता वैधानिक अधिकार प्रदान करणे हा हेतू आहे.

अशा प्रकारे, इतर गोष्टींबरोबरच, कार्यक्रम आणि संस्था यांकरिता मानके आणि दर्जा निर्धारित करणे, तंत्रशिक्षण संस्था उभारणीस मान्यता देणे, विदयार्थ्यांच्या प्रवेशाकरिता आणि फी आकारणीकरिता मार्गदर्शक तत्वे निश्चित करणे, दर्जा कायम राखण्याकरिता संस्थांचे नियमितपणे निरिक्षण आणि मूल्यमापन करणे किंवा कार्यक्रम आणि संस्थांना मान्यता देणे अथवा रोखणे हे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेला नेमून दिलेल्या शक्ती आणि कार्ये यांत अंतर्भूत आहे. या संपूर्ण समन्वय आणि विकासाच्या जबाबदारीचा एक भाग म्हणून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद ही निर्धारित विकास कारणांकरिता संस्थांना अनुदान सुद्धा देईल. याव्यतिरिक्त, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद ही नवनिर्माण, संशोधन आणि विकास, उदयोगांशी दुवा साधणे आणि महिला, दिव्यांग आणि समाजातील दुर्बल वर्गाला मोठया प्रमाणावर तंत्रशिक्षण उपलब्ध करून देणे या बाबींना चालना देईल."

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद कायदयाची प्रस्तावना खालीलप्रमाणे आहे:

" संपूर्ण देशामध्ये तंत्रशिक्षण व्यवस्थेचे योग्य नियोजन आणि समन्वित विकास

साधण्याकरिता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची स्थापना करणे, योजनाबध्द संख्यात्मक वाढीच्या संबंधाने तंत्रशिक्षणातील गुणात्मक सुधारणेला उत्तेजन देणे आणि तंत्रशिक्षण व्यवस्थेची आणि त्यास संबंधित प्रकरणांची मानके आणि दर्जा यांचे नियमन आणि जतन करणे हा या कायदयाचा हेतू आहे."

अशा प्रकारे, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद हा तंत्रशिक्षणाशी संबधित सर्वसाधारण कायदा आहे असे म्हणता येईल. हे खरे आहे की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद कायदयाच्या कलम २(ग) च्या व्याख्येनुसार म्हणजे "औषधनिर्माणशास्त्र" सुद्धा आहे. परंतु त्यासंदर्भात खालीलप्रमाणे उहापोह केला जाईल.

१४. आता, औषधव्यवसाय अधिनियम हा 'औषधनिर्माणशास्त्र' हा विशेष विषय हाताळणारा विशेष कायदा आहे असा निकाल असल्यामुळे, या न्यायालयासमोर विचारात घेण्याकरिता असा प्रश्न उभा राहातो की, फार्मसी क्षेत्रामध्ये, फार्मसी कायदा प्रभावी असेल की अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद कायदा? पुढचा प्रश्न असा आहे की, औषधनिर्माण व्यवसायामध्ये केवळ भारतीय औषधनिर्माण मंडळास पूर्ण अधिकारिता असेल की अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस?

१४.१ फार्मसी कायदा जो (वर उल्लेख केल्याप्रमाणे) विशेष कायदा आहे की एआयसीटीई कायदा जो (वर उल्लेख केल्याप्रमाणे) सर्वसाधारण कायदा आहे यांपैकी कोणता कायदा प्रभावी राहील या प्रश्नाचे आणि एआयसीटीई कायदा हा नंतरचा कायदा आहे आणि कलम २(ग) मध्ये दिलेल्या 'तंत्रशिक्षण' या शब्दाच्या व्याख्येमध्ये "औषधनिर्माण" सुद्धा समाविष्ट केले आहे, आणि नंतरचा कायदा असल्यामुळे तोच प्रभावी राहील कारण, फार्मसी कायदा उपलक्षितरित्या (ध्वनितरीत्या) निरसित होईल, या एआयसीटीईच्या निवेदनाबद्दल उत्तर देताना या न्यायालयाच्या काही निर्णयांचा उल्लेख करणे आणि ते विचारात घेणे आवश्यक आहे.

१४.२ हरी शंकर जैन (उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये, या न्यायालयासमोर “जेनरेलिया स्पेशलीबस नॉन डिरोगन्ट” हे मॅक्झिम (नीतीवचन) विचारात घेण्याचा प्रसंग आला होता. परिच्छेद ८ आणि ९ मधील संबंधित भाग पुढीलप्रमाणे आहे.

“८. ‘ “जेनरेलिया स्पेशलीबस नॉन डिरोगन्ट” हे नीतीवचन सर्वपरिचित आहे. सदर नीतीवचनामधून काढलेला नियम मेरी सेवार्ड वि. ‘व्हेरा क्रूझ’ चे मालक [(१८८४) १० ए सी ५९ ६८] या प्रकरणात खालीलप्रमाणे स्पष्ट केलेला आहे.

“आता जर काही निश्चित असेल तर ते हे की, आधीच्या कायदयातील विशेषरित्या संबधित असलेल्या विषयांपर्यंत विस्तारित न केलेले, काही वाजवी आणि संयुक्तिक अर्थाने लागू होण्याजोगे सर्वसाधारण शब्द नंतरच्या कायदयामध्ये असतील तर, असा कोणताही विशिष्ट उद्देश असल्याचे दर्शविले नसल्यास, केवळ अशा सर्वसाधारण शब्दांच्या प्रभावाव्दारे, आधीचा आणि विशेष कायदा अप्रत्यक्षरीत्या निरसित झाल्याचे, त्यात फेरफार झाल्याचे किंवा कमी दर्जाचा असल्याचे तुम्ही मानू शकत नाही.“

xxx xxx xxx

९. सर्वसाधारण तरतुदीसमोर विशेष तरतुदीला वाव देणे या नियमाचे कारण असे आहे की, एखादा विशेष कायदा पारित करताना, संसद तो विशिष्ट विषय पूर्णतः विचारात घेते. नंतर जेव्हा सर्वसाधारण कायदा पारित होतो, तेव्हा, विशेष कायदा पुनः संसदेसमोर विचारार्थ आल्याचे दिसून आल्याशिवाय, संसदेने पूर्वीचा विशेष कायदा निरसित किंवा सुधारित केला नसल्याचे गृहित धरणे हे तर्कशुध्द् आहे. लंडन आणि ब्लॅकवॉल रेल्वे वि. बांधकाम मंडळ, लाईमहाऊस जिल्हा [२६ एलजे सीएच १६४: ६९ ईआर १०४८], आणि थॉर्प वि. अॅडम्स [(१८७१) एलआर ६ सीपी

१२५] यार्व्दारे. जे अॅण्ड के कॉटन स्पिनींग अॅण्ड विव्हींग मिल्स कं. लि. वि. उत्तरप्रदेश सरकार [एआयआर १९६१ एससी ११७० : (१९६१) ३ एससीआर १८५ : (१९६१) १ एलएलजे ५४० : (१९६० – ६१) १९ एफजेआर ४३] या प्रकरणामध्ये, या न्यायालयाने पुढीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले, (परि. ११७४ मध्ये):

"सर्वसाधारण तरतुदीसमोर विशिर्ष्ट तरतुदीला वाव देणे हा नियम म्हणजे वकिलांनी आणि न्यायाधीशांनी स्वेच्छेनुसार बनवलेले तत्व नसून सर्वसाधारण स्त्री–पुरूषांच्या सामान्य समजुतीतून निर्माण झालेले तत्व आहे की, जेव्हा एकच व्यक्ती दोन सूचना (निर्देश) देते, ज्यातील एकामध्ये अनेक प्रकरणांचा सामान्यतः अंतर्भाव असतो आणि दुस–यामध्ये त्यातील केवळ काही प्रकरणांचाच अंतर्भाव असतो, तेव्हा हया संदर्भात नंतरच्या या सूचना रूढ राहाव्यात तर उरलेल्या सर्व बाबतींत पूर्वीच्या सूचना अंमलात आणाव्यात, असा त्या व्यक्तीचा हेतू असतो."

१४.३ डी. जे. बहादूर (उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये, या न्यायालयासमोर सर्वसाधारण कायदा आणि विशेष कायदा यांमधील विरोधाभास आणि 'ध्वनित निरसन' चा युक्तिवाद विचारात घेण्याचा प्रसंग आला होता. त्या निर्णयामध्ये या न्यायालयाने "केरीस ऑन स्टॅटयूट लॉ" [१९६३ आवृत्ती., पान क्र. ३७६–३७७] मधील खालील उता–यांची नोंद घेतली होती.:

४९. xxx xxx xxx

जर दोन अधिनियम परस्परांना प्रतिकूल असतील आणि जर आधीचा अधिनियम विशेष असेल आणि नंतरचा अधिनियम सर्वसाधारण असेल, तर नंतरच्या अधिनियमामुळे आधीच्या अधिनियमाचे ध्वनितरीत्या निरसन झाल्याचे गृहित धरणे, हा सर्वसाधारण नियम लागू होणार नाही, कारण "सेवार्डस्

वि. व्हेरा क्रूझ [मेरी सेवार्डस् वि. 'व्हेरा क्रूझ' चे मालक (१८८४) १० एसी ५९, ६८]" या प्रकरणामध्ये लॉर्ड सेलबोर्न यांनी नमूद केलेला कायदयाचा नियम आहे की, जर आधीच्या कायदयातील विशेषरीत्या संबंधित असलेल्या विषयापर्यंत विस्तारित न केलेले, काही वाजवी आणि संयुक्तिक अर्थाने लागू होण्यजोगे सर्वसाधारण शब्द नंतरच्या कायदयामध्ये असतील, तर, असा कोणताही विशिष्‍ट उद्देश असल्याचे दर्शविले नसल्यास, केवळ अशा सर्वसाधारण शब्दांच्या प्रभावामुळे (अंमलामुळे), आधीचा आणि विशेष कायदा अप्रत्यक्षरीत्या निरसित झाल्याचे, त्यात फेरफार झाल्याचे किंवा कमी दर्जाचा असल्याचे तुम्ही मानू शकत नाही. या प्रकरणात लागू होणारा सर्वपरिचित नियम असा आहे की, नंतरच्या सर्वसाधारण कायदयाचा आधीच्या विशेष कायदयावर अप्रत्यक्षरीत्या (ध्वनितरीत्या) परिणाम होत नाही. पुढे असे की, कायदयावर शंका घेऊ शकत नाही आणि या विषयावरील प्रकरणे मॅवसवेलच्या तिस-या आवृत्तीमध्ये एकत्रित केलेली आढळतील, ती म्हणजे "जेनरेलिया स्पेशलीबस नॉन डिरोगन्ट" म्हणजेच सर्वसाधारण तरतुदींमुळे विशेष तरतुदी रद्द होणार नाहीत.' जेव्हा विधिमंडळ एखादा स्वतंत्र विषय विचारात घेते आणि त्याकरिता तरतुदी करते, तेव्हा नंतरच्या सर्वसाधारण कायदयाचा सदर विशेष तरतुदीमध्ये हस्तक्षेप करण्याचा हेतू नसतो, जोपर्यंत त्यात तसे स्पष्‍टपणे नमूद केले नसेल. प्रत्येक कायदयाचा अन्वयार्थ हा त्याचा विषयानुसार व त्याच्या अटींनुसार लावला पाहिजे."

सदर निर्णयामध्ये असे निरीक्षण नोंदविले आहे की, "ध्वनितरीत्या निरसन" हा अंतिम न्यायिक पर्याय आहे, ज्याचा अवलंब, तशा निष्‍कर्षाप्रत आल्याशिवाय केला जात नाही. पुढे असे निरीक्षण नोंदविण्यात आले की, एखादा कायदा विशेष आहे अथवा सर्वसाधारण, हे ठरविताना, मूळ विषय आणि विशिष्‍ट दृष्‍टिकोन

यांवर भर दिला पाहिजे. असे निरीक्षण नोंदविण्यात आले की, काही विशिष्ट कारणांकरिता एखादा कायदा सर्वसाधारण असू शकतो आणि काही इतर कारणांकरिता तो विशेष असू शकतो आणि कायदयाच्या सूक्ष्म बाबी विचारात घेताना आम्ही त्यात असा संदिग्ध फरक करू शकत नाही. पुढे असे निरीक्षण नोंदविण्यात आले की, काय विशेष आहे आणि काय सर्वसाधारण, हे पूर्णतः विषय आणि संदर्भाशी निगडीत आहे आणि प्रसंग, परिस्थिती, आणि दृष्टिकोन यांनुसार त्यात बदल होऊ शकतो. कायदा हा गोषवारा नसून वास्तविकतेच्या प्रत्यक्ष चौकटीत स्वतःला स्पष्ट करतो. कोणती तरतूद विशेष आहे आणि कोणती सर्वसाधारण, हे एखादया ढोबळ निर्देशावर अथवा तत्वावर अवलंबून नसून, विशिष्ट समस्या आणि निर्णयासाठीचा विषय यांवर अवलंबून असते.

१४.४ याकूब अब्दुल रझाक मेनन (उपरोल्लेखित ) या प्रकरणामध्ये या न्यायालयास पुनः एकदा सर्वसाधारण कायदा आणि विशेष कायदा यांतील संघर्ष (विरोधाभास) विचारात घेण्याची वेळ आली होती. या बाबीसंदर्भात या न्यायालयाचे विविध निर्णय विचारात घेतल्यानंतर, खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवून ते निष्कर्ष परिच्छेद १५१८ ते १५२२ मध्ये नमूद केले.

> “१५१८. सामान्य तरतूदीमुळे विशेष तरतूद रद्द होत नाही, या अपवादाच्या अधीन राहून नंतरच्या कायदयावर पूर्वीचा कायदा प्रभावी राहील हे तत्व सातत्याने धारण केले गेले. म्हणजेच, पूर्वीच्या कायदयात अंतर्भूत असलेली अन्य कायदयाव्दारे केलेल्या विशेष तरतुदीतील परिस्थितीचा अंतर्भाव जेव्हा सर्वसाधाराण कायदयातील शब्दशः अर्थाव्दारे केला जातो, तेव्हा नंतरच्या सर्वसाधारण तरतुदीऐवजी विशेष तरतुदीव्दारे अशी परिस्थिती विचारात घेण्याचा हेतू होता, असे मानण्यात येईल.
>
> १५१९. सर्वसाधारण तरतुदीसमोर विशिष्ट तरतुदींना वाव देणे हा मूळ नियम या तत्वावर आधारित आहे की, जेव्हा एक व्यक्ती दोन सूचना (निर्देश) देते, ज्यातील एकामध्ये अनेक

प्रकरणांचा सामान्यतः अंतर्भाव असतो आणि दुस–यामध्ये त्यातील केवळ काही प्रकरणांचाच अंतर्भाव असतो. तेव्हा हया संदर्भात नंतरच्या या सूचना रूढ राहाव्यात, तर उरलेल्या सर्व बाबतींत पूर्वीच्या सूचना अंमलात आणाव्यात, असा त्या व्यक्तीचा हेतू असतो.

१५२०. मान्य असलेले कायदेशीर म्हणणे असं आहे की एखादा विशेष कायदा पारित करताना विधिमंडळ एक विशिष्ट विषय पूर्णतः विचारात घेते. म्हणून नंतर जेव्हा एखादा सर्वसाधारण कायदा पारित होतो, तेव्हा, जोवर विशेष कायदयातील भाषेवरून तसा तर्क काढता येत नसेल तोवर, विधिमंडळाने पूर्वीचा विशेष कायदा निरसित किंवा सुधारित केला नसल्याचे गृहित धरणे हे तर्कशुध्द आहे.

१५२१. एखादा कायदा विशेष आहे अथवा सर्वसाधारण, हे ठरविताना त्या कायदयाचा मूळ विषय आणि विशिष्ट दृष्टिकोन न्यायालयाने विचारात घेतला पाहिजे, कारण काही विशिष्ट कारणांकरिता एखादा कायदा सर्वसाधारण असू शकतो आणि काही इतर कारणांकरिता, तो विशेष असू शकतो आणि त्यात असा संदिग्ध फरक करु शकत नाही.

१५२२. अशा प्रकारे, जेव्हा दोन कायदयांच्या तरतुदींमध्ये विसंगती असते आणि दोन्ही विशेष प्रकारचे समजले जाऊ शकतात, तेव्हा त्या दोन कायदयांमागील मूलभूत हेतू आणि धोरण आणि त्यातील संबंधित तरतुदींच्या भाषेव्दारे व्यक्त होणारा विधिमंडळाचा स्पष्ट हेतू यांच्या आधारे, सदर विसंगतीचे निराकरण करायला पाहिजे. (राम नरेन वि. सिमला बँकिंग आणि इंडस्ट्रीयल कं. लि. [एआय आर १९५६ एससी ६१४], जे के कॉटन स्प्रिंग अॅंड विव्हींग मिल्स कं. लि. वि उत्तरप्रदेष सरकार [एआयआर १९६१ एससी ११७०], कुमावन मोटर ओनर्स युनियन लि. वि. उत्तरप्रदेश सरकार [एआयआर १९६६ एससी ७८५], सारबान सिंग वि. कस्तुरीलाल [(१९७७) १

एससीसी ७५०], यु. पी. से वि. हरी शंकर जैन [(१९७८) ४ एससीसी १६ : १९७८ एससीसी (एल अॅण्ड एस) ४८१], एल आय सी वि. डी. जे. बहादूर [(१९८१) १ एससीसी ३१५ : १९८१ एससीसी (एल अॅण्ड एस)१११], अशोका मार्केटिंग लि. वि. पंजाब नॅशनल बँक [(१९९०)४ एससीसी ४०६ : एआयआर १९९१ एससी ८५५, आणि टी. एम. ए. पै फाउंडेशन वि. कर्नाटक सरकार [(२००२) ८ एससीसी ४८१ यांद्वारे] ”

१४.५ आर एस रघुनाथ वि. कर्नाटक सरकार (१९९२) १ एससीसी ३३५ या प्रकरणामध्ये हे न्यायालय एखादया विषयावरील सर्वसाधारण कायदयाऐवजी विशेष कायदयाच्या अंमलाचा विचार करीत होते. या न्यायालयाने मॅक्सवेलच्या “कायदयाचे स्पष्टीकरण” मधील खालील परिच्छेद नमूद केले.

“केवळ ध्वन्यर्थाने नंतरचा सर्वसाधारण कायदा आधीच्या कायदयाला रद्द करू शकत नाही. जेनरेलिया स्पेशलीबस नॉन डिसेगन्ट किंवा दुस–या शब्दांत, “जर आधीच्या कायदयातील विशेषरीत्या संबंधित असलेल्या विषयापर्यंत विस्तारित न केलेले, काही वाजवी आणि संयुक्तिक अर्थाने लागू होण्याजोगे सर्वसाधारण शब्द नंतरच्या कायदयामध्ये असतील, तर असा कोणताही विशिष्ट उद्देश असल्याचे दर्शविले नसल्यास, केवळ अशा सर्वसाधारण शब्दांच्या प्रभावामुळे (अंमलामुळे) आधीचा आणि विशेष कायदा अप्रत्यक्षरीत्या निरसित झाल्याचे, त्यात फेरफार झाल्याचे किंवा कमी दर्जाचा असल्याचे तुम्ही मानू शकत नाही. अशा परिस्थितीत, विशेष कायदयाव्दारे अन्यथा आधीच तरतूद केलेल्या विशिष्ट प्रकरणांचा विचार न करता, केवळ सर्वसाधारण प्रकरणांचाच विचार करणे ग्राहय धरले जाते.”

पुढे असे की, त्यानंतर पुढे असे निरीक्षण नोंदवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात आला:

"महाराजा प्रतापसिंग बहादूर वि. ठाकूर मनमोहन डे [एआयआर १९६६ एससी १९३१ :

(१९६६) ३ एससीआर ६६३] या प्रकरणामध्ये हे तत्व लागू करताना असा निर्णय देण्यात आला की केवळ ध्वन्यर्थाने सर्वसाधारण कायदयामुळे आधीच्या विशेष कायदा रद्द होत नाही. एलीन लुईस निकोल वि. जॉन विंटर निकोल [(१९२२) १ एसी २८४] या प्रकरणामध्ये लॉर्ड फिलीमोअर यांनी खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले :

" सर्व न्यायत्वशास्त्राचे विश्वसनीय तत्व निःशंकपणे असे आहे की,नंतरच्या कायदयान्वये आधीचा विशिष्ट कायदा सहजगत्या निष्कृत झाल्याचे मानले जात नाही आणि त्यातील प्रत्यक्ष भाषेद्वारे,त्याचप्रमाणे आणि अशी सर्व प्रकरणे, जी सदर विशिष्ट कायदयांतर्गत येतात अशा प्रकरणांसंबंधी लागू होत नाही. इंग्लंडमध्ये आकलन झालेली न्यायतत्वशास्त्राची ही बाब अनेक प्रकरणांत मांडली गेली, मग आधीचा कायदा हा उघड कायदा असो अथवा मूलभूत सामाईक किंवा देशाच्या चालीरीतींना अनुरूप असा कायदा असो.

....जर आधीच्या कायदयातील विशेषरीत्या संबंधित असलेल्या विषयापर्यंत विस्तारित न केलेले, काही वाजवी आणि संयुक्तिक अर्थाने लागू होण्याजोगे सर्वसाधारण शब्द नंतरच्या कायदयामध्ये असतील, ........ तर असा कोणताही विशिष्ट उद्देश असल्याचे दर्शविलेले नसल्यास, केवळ अशा सर्वसाधारण शब्दांच्या प्रभावामुळे (अंमलामुळे) आधीचा आणि विशेष कायदा अप्रत्यक्षरीत्या निरसित झाल्याचे, त्यात फेरफार झाल्याचे किंवा कमी दर्जाचा असल्याचे मानता येत नाही. [ईडी व्हेरा क्रूझ केस (१८८४) १० एसी ५९, ६८ मधील अवतरण]."

जस्टीनीआनो ऑगस्टो दे पिडादे बॅरेटो वि. अॅन्टोनिओ व्हिसेन्ट दा फोनेस्का [(१९७९) ३ एससीसी ४७: एआयआर १९७९ एससी ९८४] या प्रकरणामध्ये या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले की, मूलतः सर्वसाधारण प्रकारच्या कायदयामध्ये विशिष्ट प्रकरणांशी संबंधित विशेष तरतुदी असू शकतात आणि

अशा प्रकरणांच्या बाबतीत त्याचे वर्गीकरण विशेष कायदा असे होईल. म्हणून विशेष कायदा स्पष्टरीत्या निरसित करून किंवा त्या कायदयाशी पूर्णतः विसंगत तरतुदी करून तो रद्द केल्याशिवाय, असा विशेष कायदा केवळ ध्वन्यर्थीयाने रद्द झाल्याचे गृहित धरता येऊ शकत नाही."

१५. उपरोक्त निर्णयांमध्ये या न्यायालयाने मांडलेला कायदा लागू केल्यानुसार आणि उपरोल्लेखित नोंदविलेल्या निरीक्षणानुसार औषधनिर्माण क्षेत्रामध्ये फार्मसी (औषधनिर्माण) कायदा हा विशेष कायदा आहे आणि औषधनिर्माण क्षेत्रामध्ये सदर कायदा स्वतःच एक संहिता आहे. एआयसीटीई कायदा, जो वर निरीक्षण नोंदविल्याप्रमाणे तांत्रिक शिक्षण /संस्था यांच्याशी निगडीत सर्वसाधारण कायदा आहे, त्यावर फार्मसी (औषधनिर्माण) कायदयाचे वर्चस्व राहील. म्हणून, एआयसीटीई कायदा हा नंतरचा कायदा आहे आणि त्याच्या 'तंत्रशिक्षण' या शब्दाच्या व्याख्येमध्ये 'फार्मसी' (औषधनिर्माण) चा अंतर्भाव आहे आणि म्हणून "ध्वन्यर्थीय निरसन" झाल्याचे म्हणता येऊ शकते हे एआयसीटीई आणि /किंवा संबंधित शैक्षणिक संस्थांचे निवेदन मान्य करता येऊ शकत नाही. अशा परिस्थितीत हे नमूद करणे आवश्यक आहे की, एआयसीटीई कायदयामुळे फार्मसी कायदा स्पष्टपणे निरसित झालेला नाही, विशेषतः जेव्हा वर नोंदविलेल्या निरीक्षणानुसार फार्मसी कायदा हा विशेष कायदा आहे आणि नंतरचा एआयसीटीई कायदा हा सर्वसाधारण आहे आणि म्हणून फार्मसी कायदा हा विशेष कायदा असल्याने प्रभावी राहील. याव्यतिरिक्त, अनेक बाबीं ज्या केवळ पीसीआयच्या कार्यक्षेत्रात आहेत, त्यासंदर्भात एआयसीटीई कायदयामध्ये कोणतीही तरतूद केलेली नाही. त्यामुळे फार्मसी कायदयाचे "ध्वनितरीत्या निरसन" झाल्याचे मान्य करता येत नाही.

१६. आता पुढचा विचारात घेण्याजोगा प्रश्न असा आहे की, फार्मसीच्या क्षेत्रात, पीसीआयची अधिकारिता राहील की, सर्वसाधरण कायदा म्हणून ठरविण्यात आलेल्या एआयसीटीई कायदयान्वये स्थापन झालेल्या एआयसीटीईची अधिकारिता राहील. भारतीय औषधव्यवसाय परिषद (फार्मसी काउन्सिल ऑफ इंडिया)

खालील स्थापन झालेल्या केंद्रीय परिषदेची घटना आणि रचना खालीलप्रमाणे आहे.

**"३. केंद्रीय परिषदेची स्थापना आणि रचना –**

केंद्र सरकार लवकरात लवकर, केंद्रीय परिषदेची स्थापना करेल, ज्यामध्ये खालील सदस्यांचा समावेश असेल:–

(अ) सहा सदस्य, ज्यांमध्ये औषधरसायनशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, औषधशास्त्र आणि औषधअभिज्ञान यांतील प्रत्येक विषयातील किमान एक शिक्षक, जे विदयापीठ अनुदान आयोगाने फार्मसीमध्ये पदवी अथवा पदविका देणा–या भारतीय विदयापीठ किंवा त्यास संलग्न महाविदयालयातील अध्यापक कर्मचारी यांतून निवडलेले असतील,

(ब) सहा सदस्य, ज्यातील किमान चार व्यक्ती, केंद्र सरकारने नामनिर्देशित केलेली औषधनिर्माणशास्त्र किंवा औषेधरसायनशास्त्र या विषयांतील पदवी किंवा पदविका धारण करत असतील आणि तसा व्यवसाय करत असतील;

(क) मेडिकल काऊन्सिल ऑफ इंडियाच्या सदस्यांनी त्यांच्यातून निवडलेला एक सदस्य.

(ड) महासंचालक, आरोग्य सेवा, पदसिध्द किंवा जर त्यांना एखादया बैठकीस उपस्थित राहणे शक्य नसेल तर त्याकरिता त्यांनी लेखी स्वरूपात अधिकृत केलेली व्यक्ती;

भारतीय ड्रग्स कंट्रोलर (भारतीय औषध महानियंत्रक), पदसिध्द किंवा जर त्यांना एखादया बैठकीस उपस्थित राहणे शक्य नसेल तर त्याकरिता त्यांनी लेखी स्वरूपात अधिकृत केलेली व्यक्ती;

(इ) केंद्रीय औषध प्रयोगशाळेचे संचालक, पदसिध्द;

(फ) विदयापीठ अनुदान आयोगाचा एक प्रतिनिधी आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचा एक प्रतिनिधी;

(ग) प्रत्येक राज्याच्या परिषदेतील सदस्यांनी आपसांतून निवडलेला आणि त्या राज्याचे प्रतिनिधीत्व करणारा एक सदस्य, जो नोंदणीकृत औषधतज्ज्ञ असेल;

(घ) प्रत्येक राज्य सरकारने नामनिर्देशित केलेला आणि त्या राज्याचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य, जो नोंदणीकृत औषधतज्ज्ञ असेलः”

तरी, पीसीआयमध्ये औषधनिर्माण आणि औषधनिर्माणाच्या शिक्षणाशी निगडीत असलेल्या संबंधित विषयांमधील तज्ज्ञांचा समावेश असतो. म्हणून कायदयानुसार, औषधी, औषधनिर्माण वगैरे या क्षेत्रातील विशेष तज्ज्ञ व्यक्ती पीसीआयचे सदस्य असतील.

१६.१. दुसरीकडे, एआयसीटीई संदर्भात केवळ एक सदस्य, औषधनिर्माण (फार्मसी) क्षेत्रातील असेल आणि तो सुध्दा पीसीआयचा प्रतिनिधी असेल. अशा परिस्थितीत, पीसीआय हे औषधनिर्माण विषयाशी आणि त्यासंबंधित विषयांशी निगडीत असलेल्या तज्ज्ञांचे मंडळ आहे आणि म्हणून फार्मसीच्या क्षेत्रात एआयसीटीई ऐवजी केवळ पीसीआयची अधिकारिता असणे हे अधिक हिताचे आहे आणि विशेषतः फार्मसीच्या शिक्षणाच्या दृष्टीने अधिक हिताचे आहे.

१७. उपरोक्त प्रश्नाचा दुस–या दृष्टिकोनातून विचार करणे देखील आवश्यक आहे. पीसीआय आणि एआयसीटीई हे दोन्ही संसदेने केलेले कायदे आहेत. म्हणून दोन्ही केंद्रीय अधिकारी मंडळे असलेल्या दोन नियंत्रकांना सर्वाधिकारासाठी वाद घालण्याची अनुमती देणे, हे मुळीच निरोगी (निकोप) नाही. एकाच क्षेत्रात कार्यरत असलेल्या दोन नियंत्रकांना सर्वाधिकाराकरिता वाद घालण्याची अनुमती देणे, हे शिक्षणक्षेत्रासाठी तसेच संस्थांसाठीही धोकादायक आहे म्हणूनसुध्दा आणि विशेषतः पीसीआय मध्ये औषधनिर्माण (फार्मसी) आणि इतर संबंधित विषयातील तज्ज्ञांचा समावेश असताना, फार्मसीच्या क्षेत्रात पीसीआयलाच अधिकार देणे अधिक हिताचे आहे.

१७.१. श्री. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये या न्यायालयासमोर हाच प्रश्न विचारार्थ आला होता. त्या प्रकरणात हे न्यायालय वास्तुशास्त्र क्षेत्रातील समान तरतुदींचा आणि दोन संस्थांमध्ये मतभिन्नता असल्यास, वास्तुशास्त्र शिक्षणाचा अभ्यासक्रम चालवण्याकरिता संस्थांना मान्यता देणे आणि इतर संबंधित विषय, या मुद्द्यांवर वास्तुशास्त्र मंडळाचा आदेश प्रभावी राहील की एआयसीटीईचा आदेश प्रभावी राहील या प्रश्नाचा विचार करत होते. या प्रसंगी हे नमूद करणे आवश्यक आहे की, कलम २(ग) मध्ये 'तंत्रशिक्षण' शब्दाच्या व्याख्येमध्ये औषधनिर्माण (फार्मसी) प्रमाणे वास्तुशास्त्राचासुध्दा समावेश केलेला आहे. त्या प्रकरणातसुध्दा, 'वास्तुशास्त्र अधिनियम' हा एआयसीटीई अधिनियम, १९८७ च्या पूर्वी, म्हणजेच १९७२ मध्ये अस्तित्वात आला. वास्तुशास्त्र अधिनियमाची योजना आणि वास्तुशास्त्र परिषदेची शक्ती आणि कार्ये विचारात घेतल्यानंतर या न्यायालयाने निरीक्षण नोंदवून असा निर्णय दिला की, वास्तुशास्त्र अधिनियम हा विशेष अधिनियम आहे आणि दोन मंडळांच्या मतांमध्ये संघर्ष/विसंगती असल्यास, वरील एआयसीटीई कायदा हा सर्वसाधारण कायदा असल्याने, त्यावर वास्तुशास्त्र अधिनियम प्रभावी राहील.

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये एआयसीटीईने केलेली समान (अशाच प्रकारची) निवेदने विचारात घेतल्यानंतर, परिच्छेद ६३ आणि ६४ मध्ये खालीलप्रमाणे अंतिम निरीक्षण नोंदवून निर्णय देण्यात आला.

> ६३. आमचे मत असे आहे की, १९८७ च्या अधिनियमातील कलम २ (ग) च्या तरतुदींसंदर्भात "तंत्रशिक्षण' शब्दाच्या व्याख्येची रचना अशा प्रकारे असेल आणि ज्या प्रकरणामध्ये तंत्रशिक्षण देणा–या संस्थांकरिता एआयसीटीई स्वतःची नियामक रचना सूचित करते, त्या प्रकरणांमध्ये "वास्तुशास्त्र" हा शब्द गैरलागू असल्याचे समजले पाहिजे. परंतु तिथे दुस–या शब्दाची गरज नाही

कारण संदर्भानुसार ते आवश्यक नाही. १९८७ च्या अधिनियमाच्या अंमलबजावणीमध्ये असाध्य परिणामांना प्रतिबंध करण्याकरिता बाहयसंदर्भासाठी, व्याख्येच्या कलमाची अशी रचना आवश्यक आहे. १९८७ चा अधिनियम कार्यान्वित असल्यामुळे,जिथे वास्तुशास्त्र शिक्षणाशी संबंधित तरतुदींचा प्रश्न आहे, तिथे ध्वन्यर्थ निरसनाचे तत्व लागू करता येणार नाही. वास्तुशास्त्राच्या पात्रतेला अधिकृत मान्यता देणे हा १९७२ च्या अधिनियमाचा एक प्रबळ (प्रमुख) हेतू आहे. अशी मान्यताप्राप्त पात्रता प्राप्त करण्यावर वास्तुविशारदाची नोंदणी अवलंबून असते. तंत्रशिक्षण शब्दाच्या व्याख्येमध्ये “वास्तुशास्त्र” हा शब्द अंतर्भूत केला आहे या केवळ एका कारणाकरिता सदर अधिनियमाचे ध्वनितरीत्या निरसन झाले असे मानता येऊ शकत नाही. १९७२ च्या अधिनियमातील सदर ७१ तरतुदी ध्वनितरीत्या निरसित झाल्या हे सिध्द करण्याचे कर्तव्य बजावण्यामध्ये एआयसीटीई अयशस्वी झालेली आहे.

६४. अशा त–हेने आम्ही असा निर्णय देतो की, जिथे वास्तुशास्त्र शिक्षणाच्या पदवी आणि पदविकांना मान्यता देण्याचा संबंध आहे, तिथे १९७२ चा अधिनियम प्रभावी राहील. एआयसीटीईला वास्तुशास्त्र विषयातील पदवी आणि पदविकांसंदर्भात कोणतेही नियामक उपाय योजण्याचा अधिकार नसेल. वास्तुशास्त्रामधील पदवी आणि पदविका यांकरिता शिक्षण देणा–या संस्थांना १९७२ च्या अधिनियमानुसार वास्तुशास्त्र परिषद (सीओए) आणि इतर मंडळांनी निश्चित केलेला दर्जा आणि नियम पाळावे लागतील.

१८. श्री. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस कॉलेज ऑफ आर्किटेक्चर” (उपरोल्लेखित) या प्रकरणामधील या न्यायालयाच्या दृष्टिकोनाशी आम्ही पूर्णतः सहमत आहोत. अन्यथा गुणवत्तेवरसुध्दा, उपरोक्त नोंदविलेल्या निरीक्षणानुसार आणि निर्णयानुसार औषधनिर्माण क्षेत्रामधील विशेष अधिनियम असलेला फार्मसी

(औषधनिर्माण) कायदा प्रभावी राहील आणि परिणामी, जिथे फार्मसी शिक्षणाची पदवी आणि पदविकांना मान्यता देण्याचा संबंध आहे, तिथे फार्मसी कायदा प्रभावी राहील. उपरोक्त नोंदविलेल्या निरीक्षणानुसार, औषधव्यवसाय (फार्मसी) कायदयान्वये स्थापन झालेली आणि फार्मसीच्या क्षेत्रामधील आणि /किंवा संबंधित विषयांमधील तज्ज्ञांचा समावेश असलेली पीसीआय प्रभावी राहील. परिणामी, फार्मसीमधील पदवी आणि पदविका यांकरिता शिक्षण देणा-या संस्थेला, पीसीआय आणि औषधव्यवसाय कायदयाखालील विनिर्दिष्ट मंडळांनी निश्चित केलेल्या दर्जा आणि नियमांचे पालन करावे लागेल.

१९. आता, एआयसीटीई तर्फे विद्वान वकिलांनी राज्यघटनेच्या अनुच्छेद ३७२ वर दिलेला भर विचारात घेता, प्रथमतः हे नमूद करणे आवश्यक आहे की, राज्यघटनेच्या अनुच्छेद ३७२ नुसार सुध्दा, जोवर घटनापूर्व अधिनियम स्पष्टपणे (विशिष्टरीत्या) निरसित होत नाही, तोवर तो कार्यान्वित राहातो. प्रस्तुत प्रकरणात, एआयसीटीई कायदयामध्ये सुध्दा, औषधव्यवसाय अधिनियम, १९४८ चे स्पष्टपणे (विशिष्टपणे) निरसन झालेले नाही. उपरोल्लेखित निरीक्षणानुसार, त्यात "ध्वन्यर्थ निरसन" सुध्दा नाही. म्हणून राज्यघटनेच्या अनुच्छेद ३७२ वर दिलेला भर चुकीचा आहे.

२०. या परिस्थितीत हे नमूद करणे आवश्यक आहे की, तंत्रशिक्षणासाठी पीसीआय आणि एआयसीटीई द्वारे निश्चित केलेल्या दुहेरी नियमांमुळे उद्भवणा-या अडचणी लक्षात आल्यानंतर, पीसीआय आणि एआयसीटीई यांनी तंत्रशिक्षणामध्ये निश्चित केलेले (सदर) दुहेरी नियम संपुष्टात आणण्याकरिता, दिनांक ०३.१०.२०१८ रोजी केंद्र सरकारचे स्वास्थ्य आणि परिवार कल्याण मंत्री आणि मनुष्यबळ विकास मंत्री यांच्यात मंत्रीस्तरावर बैठक झाली. स्वतः एआयसीटीईने दाखल केलेल्या प्रति-प्रतिज्ञापत्रात सदर बैठकीमध्ये यांची नोंद घेतल्याचे म्हटले आहे आणि केंद्र सरकारतर्फे विद्वान एएसजी, श्रीमती पिंकी आनंद यांनीसुध्दा असे सादर केले आहे की, सदर बैठकीमध्ये असे नमूद करण्यात आले की, औषध व्यवसाय

(फार्मसी) अधिनियम, १९४८ आणि एआयसीटीई अधिनियम, १९८७ या दोन्ही अधिनियमांमध्ये तंत्रशिक्षणाशी संबंधित तरतुदींचा समावेश आहे, ज्यामुळे क्षेत्रीय स्तरावर नियमांची व्दिरुक्ती आणि लक्षणीय गोंधळ उद्भवला आहे. त्यामुळे एकमताने असे ठरविण्यात आले की, असे दुहेरी नियम ताबडतोब संपुष्टात आणावेत आणि सर्वसाधारण तंत्रशिक्षणावर नियंत्रण असलेल्या एआयसीटीई अधिनियमामधून 'औषधनिर्माण' (फार्मसी) हा शब्द वगळून, सदर अधिनियम सुधारित करावा आणि त्यानंतर औषधनिर्माण (फार्मसी) शिक्षणावर औषधव्यवसाय अधिनियम, १९४८ चे नियंत्रण राहील. असे सादर करण्यात आले की, एआयसीटीई अधिनियमामधील कलम २ (ग) मध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यात आली होती, परंतु नवीन प्रस्तावित भारतीय उच्च शिक्षण परिषदेची निर्मिती आणि एनईपी (नवीन शैक्षणिक धोरण) ला अंतिम स्वरुप देणे, ज्याचा फार्मसी अधिनियमाशी तसा काहीही संबंध नाही, या परिणामस्वरुप, त्यामध्ये पुढे काहीही प्रगती झाली नाही. अशा प्रकारे केंद्र सरकारच्या मतेसुध्दा, एआयसीटीई अधिनियमाच्या कलम २ (ग) मधील 'तंत्रशिक्षण' शब्दाच्या व्याख्येमधून 'औषधनिर्माण' (फार्मसी) हा शब्द वगळणे आवश्यक आहे.

२१. अशा परिस्थितीत आणि उपरोक्त नमूद केलेल्या कारणांनुसार, असे धारण करण्यात (ठरविण्यात) येत आहे की फार्मसी शिक्षणाच्या क्षेत्रात आणि विशेषतः ज्यामध्ये फार्मसी शिक्षणातील पदवी आणि पदविकांना मान्यता देण्याचा संबंध आहे, अशा प्रकरणांमध्ये औषधव्यवसाय (फार्मसी) अधिनियम, १९४८ प्रभावी राहील. फार्मसीमध्ये पदवी आणि पदविका देण्याकरिता शिक्षण देणा–या संबंधित संस्थांना, विदयार्थ्यांच्या प्रवेशक्षमतेमध्ये वाढ आणि/ किंवा घट करण्याबाबतचे निकष आणि नियम यांसह, पीसीआय आणि फार्मसी अधिनियमान्वये विनिर्दिष्ट केलेल्या इतर संस्थांनी निश्चित केलेले निकष आणि नियम यांचे पालन करावे लागेल आणि फार्मसीमधील पदवी आणि पदविका देण्या–या संस्थांना केवळ पीसीआयच्या निर्णयांचे पालन करावे लागेल. अशा प्रकारे प्रश्नांची उत्तरे दिली आहेत.

२२. आता यापुढील विचारात घेण्यासाठी आवश्यक असलेला प्रश्न हा, या न्यायालयाने आणि संबंधित उच्च न्यायालयांनी पारित केलेल्या आदेशानुसार याआधीच प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांच्या संदर्भात आहे. हा संघर्ष आणि वाद उद्भवला कारण ज्या संबंधित संस्थांची प्रवेशक्षमता वाढविण्यास पीसीआयने मान्यता दिली नव्हती, अशा संबंधित संस्थांची प्रवेशक्षमता, पीसीआयच्या नकारानंतरही, एआयसीटीईने वाढविली. या न्यायालयाने आणि संबंधित उच्च न्यायालयांनी, अंतरिम आदेशाद्वारे, अशा विदयार्थ्यांना परीक्षांना बसण्याची परवानगी देण्याचे आणि त्यांना फार्मसिस्ट (औषधतज्ज्ञ) म्हणून नोंदणी करण्याचे निर्देश दिले. सदर अंतरिम आदेश अंतिमसुध्दा करण्यात आले. म्हणून वाढीव प्रवेशक्षमतेमुळे आणि/ अथवा या न्यायालयाने पारित केलेल्या अंतरिम आदेशांनुसार आणि/ किंवा संबंधित उच्च न्यायालयाने पारित केलेल्या न्यायनिर्णयानुसार आणि आदेशानुसार, प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांवर प्रस्तुत निर्णयाचा परिणाम होणार नाही. त्यामुळे अशा विदयार्थ्यांना नोंदणीचे परिणामस्वरूप फायदे देण्याचे निर्देश पीसीआयला देण्यात येत आहेत. परंतु त्याच वेळेस, फार्मसीमध्ये प्रवेशक्षमता वाढविण्याविषयीचे आणि/ किंवा फार्मसीमधील अभ्यासक्रम/संस्थांच्या अधिकृत मान्यतेसाठीचे आणि/ किंवा मंजुरीसाठीचे सर्व प्रलंबित अर्ज हे फार्मसी (औषधव्यवसाय) अधिनियम, १९४८ नुसार आणि त्याअन्वये काही नियम केलेले असल्यास, त्यानुसार आणि पीसीआयने निश्चित केलेल्या निकष आणि नियमांनुसार असतील. पुढे असे निर्देश देण्यात येत आहेत की, ज्या संबंधित संस्थांनी एआयसीटीईने मंजुरी दिल्यानुसार त्यांची प्रवेशक्षमता वाढविली आणि त्यांच्या अशा वाढीव प्रवेशक्षमतेस पीसीआयने मंजुरी दिली नव्हती, अशा संस्थांनी पुढील शैक्षणिक वर्षाकरिता प्रवेशक्षमता वाढविण्यासाठी आणि/ किंवा सायंकालीन सत्राकरिता आजपासून चार आठवडयांच्या कालावधीत नव्याने अर्ज करावेत आणि त्यांची प्रवेशक्षमता वाढविण्याबाबतची प्रकरणे आणि / अथवा त्यांचे मान्यतेसाठीचे अर्ज आणि / किंवा अभ्यासक्रमाच्या किंवा सायंकालीन सत्राबाबतच्या मंजुरीसाठीचे अर्ज, औषधव्यवसाय (फार्मसी) अधिनियम,

१९४८ च्या अनुषंगाने आणि त्याअन्वये तयार केलेले नियम आणि कायदे तसेच पीसीआयने निश्चित केलेले नियम आणि कायदे तसेच पीसीआयने निश्चित केलेले निकष, यांनुसार पीसीआय विचारात होईल.

२३. अशा प्रकारे, ही सर्व ट्रान्सफर (बदली) प्रकरणे / अपील/ रिट याचिका निकाली काढण्यात येत आहेत.

....................न्या.
(अरूण मिश्रा)

....................न्या.
(विनीत सरन)

....................न्या.
(एम्. आर. शहा )

नवी दिल्ली ;
५ मार्च, २०२०.

------------------------

DISCLAIMER

The Translated judgment in vernacular language is meant for the restricted use of the litigant too understand it in his/her language and may not be used for any other purpose. For all practical and official purposes, the English version of the judgment shall be authentic and shall hold the field for the purpose of execution and implementation".

sane madam 65 folio

Parab madam 45 folio

total 110 folio